# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

वर्ष : अठरावे
जानेवारी २०२६
अंक : पहिला
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ५२


गिरीश कुबेर यांच्या इंग्लंड दौऱ्यातील
पर्यटनाचा हा निखळ आनंदानुभव.
इंग्लंडचं अंतरंग उलगडून दाखवणारी
त्यांची ही सचित्र अविस्मरणीय सफर वाचकांनाही
अनोखा प्रवास घडवणारी....



'नाटक म्हणजे अल्प रंगमंचसज्जा, सशक्त कथानक आणि
सामर्थ्यवान भावस्पर्शी अभिनय यांच्या बळावर प्रेक्षकांना
स्वत:चा व समाजाचा गंभीर विचार करायला लावणारं महत्त्वाचं माध्यम आहे,'
हे 'नाट्यभारती'नं आपल्या नाट्यकार्यातून दाखवून दिलं.
बृहन्महाराष्ट्रातील मराठी जनांची नाळ आजही
महाराष्ट्रीय संस्कृतीशी व भाषेशी जोडलेली आहे,
हे अधोरेखित करणारा इंदूरच्या रंगकर्मींचा सात दशकांचा सर्जक प्रयोग म्हणजे

**'नाट्यभारती'**

सुनीता लोहोकरे



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
तृप्ती देशपांडे

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

वर्ष अठरावे :
अंक पहिला
१५ जानेवारी २०२६

मूल्य : ₹ १०/-


अनुक्रम :

- संपादकीय / ५
- संवाद 'राजहंसी' लेखकांसोबतचा
  *'काळ्यानिळ्या रेषा'* - राजू बाविस्कर यांची मुलाखत -
  मुलाखतकार : डॉ. प्रिया निघोजकर / १३
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *आबली* - अविनाश महादेव जाधव / १९
  *कथा शिवचित्रांच्या... व्यथा शिवचरित्रांच्या...*
  - डॉ. सुनीलकुमार सरनाईक / २२
- आम्हां असे अभिमान
  *झाडाझडती* - विश्वास पाटील / २५
- असे जन्मले पुस्तक!
  *जीवदान* - डॉ. सुधीर राजाराम देवरे / ३१
- आठवणींचा पारिजात
  *फिरुनी नवी जन्मेन मी...*
  - डॉ. मानसी मागीकर / ३५
- क... कवितेचा - डॉ. प्रसन्न दाभोलकर / ३९
- उद्गार - *सय* - स्वप्निल जोशी / ४१
- राजहंसी पार / ४३
- वाचकांच्या मनातलं... / ४५

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




डॉ. गायत्री आणि डॉ. गुरुदास हर्षे यांचा
अंटार्क्टिका मोहिमेचा हा रोमांचक अनुभव!
त्यांच्या साहसकथेतील निसर्गविज्ञान,
इतिहास, भूगोल यांविषयीचे संदर्भ
आपले आकलन समृद्ध करणारे
आणि मार्गदर्शकही.
तेव्हा जरूर वाचा...

### अलौकिक अंटार्क्टिका

अद्‌भुत प्रवास - शिडाच्या नौकेतून

डॉ. गायत्री हर्षे

किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)



नृत्य हाच श्वास... नृत्य हाच प्राण...
तोच मार्ग आणि तेच गंतव्य असणाऱ्या
कथक नृत्यांगना शमा भाटे
यांच्या नृत्यमय जीवनाची ही गाथा!
लय-नाद-ताल यांच्यामध्ये
सार्थक सापडलेल्या या कलासंपन्न विदुषीचा
हा 'नाद - रूप' प्रवास
म्हणजे गेल्या पाच दशकांतील
सांस्कृतिक स्पंदनेच...!

### नृत्यमय जग...
### नर्तनाचा धर्म...

शमा भाटे

किंमत : ₹ ७५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# संपादकीय

## रंग उगवतीचे... चैतन्याचे!

*पुणे शहर हे महाराष्ट्राची ‘सांस्कृतिक राजधानी’ म्हणून ओळखलं जातं. शिक्षण, साहित्य, समाजकारण आणि वाचनसंस्कृती यांचा सशक्त वारसा लाभलेल्या या शहरात ’पुणे पुस्तक महोत्सव’ ही संकल्पना अल्पावधीतच साहित्यविश्वाचं महत्त्वपूर्ण केंद्र बनली आहे. यंदाचा सलग चौथ्या वर्षीचा हा महोत्सव केवळ पुस्तकविक्रीचा नवा विक्रम करणारा ठरला नाही; तर वाचक, लेखक, प्रकाशक, संशोधक यांच्यातील संवादाचा, वैचारिक देवाणघेवाणीचा आणि वाचनसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचा व्यापक मंच ठरला.*

वाचकहो, नमस्कार.

२०२५ हे आंग्ल वर्ष मागे सारत आपण मोठ्या उत्साहानं, आनंदानं आणि आश्वासकपणे २०२६मध्ये प्रवेश केला आहे. गत वर्षात आपल्या साहित्यिक क्षेत्रात अनेक घडामोडी घडल्या. ‘कृत्रिम बुद्धिमत्ता’ या नव्या तंत्रानं आपलंही जग व्यापायला सुरुवात केली आहे. असं असलं तरी एक आश्वासक बाब आपल्याला नजरेआड करून चालणार नाही. ती म्हणजे, पुस्तकजगताविषयी लोकांना वाटणारं आपलेपण, कुतूहल. याचा प्रत्यय नुकताच फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर दि. १३ डिसेंबर ते २१ डिसेंबर या कालावधीत संपन्न झालेल्या चौथ्या भव्य पुस्तक महोत्सवामध्ये आला. ९९व्या ‘अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना’चे अध्यक्ष, ‘राजहंसी’ साहित्यिक, ‘पानिपत’कार विश्वास पाटील यांच्या हस्ते महोत्सवाचं उद्‌घाटन झालं. आपल्यासारख्या जाणत्या वाचकांसमोर या संदर्भानंच काही मांडावं असं ठरवलं आहे.

दरवर्षी डिसेंबर महिना म्हटलं की, रसिक पुणेकरांसाठी सांस्कृतिक मेजवानी असते. ‘सवाई गंधर्व संगीत महोत्सव’, साहित्यप्रेमी भगिनी मंडळाचं ‘स्त्री साहित्य संमेलन’, ‘अनुवाद साहित्य संमेलन’, ‘पुस्तक महोत्सव’ असे एक ना अनेक सोहळे अनुभवण्यास मिळतात.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (नॅशनल बुक ट्रस्ट) पुढाकारातून तसेच फर्ग्युसन महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे महानगरपालिका या संस्थांच्या मौलिक योगदानातून आणि समन्वयातून यंदाचा हा महोत्सव दिमाखदार

स्वरूपात व यशस्वीरीत्या संपन्न झाला.

यंदाच्या महोत्सवानं आधुनिक व्यवस्थापन, लोकसहभाग आणि सांस्कृतिक बहुविधता यांचा सुंदर समन्वय साधत हजारो वाचकांना सकस साहित्याची पर्वणी दिली. केवळ मराठी नव्हे; तर हिंदी, इंग्रजी व इतर भारतीय भाषांतील साहित्य एकत्र आणणं, नवोदित लेखकांना व्यासपीठ देणं आणि वाचकांना थेट संवादाची संधी उपलब्ध करून देणं ही या महोत्सवाची वैशिष्ट्यं म्हणता येतील. यंदाचा महोत्सव आधीच्या तुलनेत व्यापक, सर्वसमावेशक आणि वैविध्यपूर्ण स्वरूपात साजरा झाला आणि आता पुढील वर्षापासून जागतिक साहित्यदालनांचाही समावेश या महोत्सवात असणार आहे हे समजलं. हेदेखील आश्वासक चित्र आहे.

स्थूल मानानं जरी या महोत्सवाचा विचार केला तरी त्याची भव्यता डोळे दीपवणारी आहे. साडेबारा लाख नागरिकांनी भेट देत सुमारे ३० लाखांपेक्षा अधिक पुस्तकांची खरेदी या महोत्सवात केली. त्यातून सुमारे ५० कोटींपेक्षा अधिक आर्थिक उलाढाल झाल्याचं समजलं. हा आकडा कमी-जास्त असेलही. तरीही तो केवळ संख्यात्मकदृष्ट्या आनंद देणारा नाही; तर लोकांची पुस्तक विकत घेऊन वाचण्याची मानसिकता वाढतेय याचंच ते द्योतक आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत पुस्तकांची ही विक्री आणि पुस्तक खरेदी करणाऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचंही संयोजकांनी सांगितलं. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे महोत्सवात ६० टक्क्यांपेक्षा अधिक सहभाग युवकांचा होता. त्यामुळे युवकांमध्ये वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी ‘पुणे पुस्तक महोत्सव’ यशस्वी ठरत असून, आता हा महाराष्ट्राचाही महोत्सव होत असल्याचं चित्र निर्माण झालं आहे. तरुणांसोबतच शालेय विद्यार्थ्यांची संख्याही लक्षणीय होती. मोबाईल आणि गॅजेट्सच्या दुनियेतून बाहेर पडून नागरिक, युवा पिढी आणि शालेय मुलं पुस्तकांमध्ये रमल्याचं सकारात्मक चित्र या महोत्सवात पाहायला मिळालं. लेखकांशी संवाद साधण्यासाठी आणि स्वाक्षरी घेण्यासाठी ही मंडळी उत्सुक होती. शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल यांचा सहभाग लक्षणीय होता. अनेक महाविद्यालयं आणि शाळा विद्यार्थ्यांना घेऊन पुणे पुस्तक महोत्सवात आल्या. याच ठिकाणी ‘ग्रंथपालांचे संमेलन’ही उत्साहात संपन्न झालं. त्यात २००पेक्षा अधिक ग्रंथपाल सहभागी झाले होते. वाचक मेळावा दिवसभर उत्साहात रंगला होता. महोत्सवात अनेक भारतीय भाषिक पुस्तकांची दालनं असल्यानं, सर्वभाषिक नागरिकांची उपस्थिती होती. ‘सांस्कृतिक कार्यक्रम’, ‘पुणे लिट फेस्टिव्हल’ आणि ‘चिल्ड्रेन कॉर्नर’ अशा तिन्ही ठिकाणचा उत्साह कमालीचा होता.

महोत्सवस्थळी ठिकठिकाणी उभारलेली कल्पक व कलात्मक वाचनशिल्पं, वृक्षलतांवर पुस्तकांची केलेली सर्जक मांडणी यामुळे वातावरण अधिकच उत्साहवर्धक झालं होतं.

या महोत्सवाची आणखीही काही ठळक वैशिष्ट्यं आपण लक्षात घेण्यासारखी आहेत. या महोत्सवाला सुमारे एक हजार साहित्यिकांनी भेट दिली. ४०० शाळांमधील ३० हजारहून अधिक विद्यार्थी 'चिल्ड्रन्स कॉर्नर'मध्ये सहभागी झाले. यंदा प्रथमच संयोजकांच्या वतीनं पत्रकार, विद्यार्थी, शिक्षणसंस्था, साहित्यिक आदींना महोत्सवातर्फे एक लाख रूपयांचे कूपन्स देण्यात आले आणि त्यातून १ कोटीहून अधिक किमतीची पुस्तकं खरेदी करण्यात आली. दोनशेहून अधिक शाळा, महाविद्यालयं आणि विद्यापीठाच्या ग्रंथालयांनी महोत्सवातून लाखो रुपयांची पुस्तकं खरेदी केली. महोत्सवात १५० पुस्तकदालनांमधून विक्रमी ४९८ पुस्तकांचं प्रकाशन झालं, तर १२२ नामवंत वक्त्यांनी पुणेकरांशी संवाद साधला.

महोत्सवाचाच एक भाग असणाऱ्या 'शांतता पुणेकर वाचत आहेत' या सलग तिसऱ्या वर्षीही घेण्यात आलेल्या उपक्रमात पुण्यासोबतच पुण्याबाहेरील व परदेशातील व्यक्तींनीही ऑनलाईन पद्धतीनं सहभाग घेतला हे विशेष आहे.

हे सारं आपल्यासाठी आश्वासक आणि आनंददायी असलं तरी काही गोष्टींबाबत आपण चिंतनशील व्हायला हवं. पुस्तकांची खरेदी आणि पुस्तकांचं वाचन, पुन्हा पुस्तकांचं वाचन आणि प्रत्यक्ष जगणं यांची सांगड कितपत जमलीय, हे केवळ हा महोत्सव अनुभवून समजणं अशक्य आहे. कोणत्या साहित्यप्रकारात वाचक रस घेतायत, हे विचारात घेणंही महत्त्वाचं आहे. त्याबाबत आपण केवळ आशावादी राहू शकतो.


'To read means to live & that is understanding' असं जे. कृष्णमूर्ती म्हणतात. हा आशय वाचनाच्या संदर्भात आपलं जगणं व्हावा. वाचक आणि लेखकाचं मन जोडलं जाणं महत्त्वाचं आहे. वाचन कला, संस्कृती आणि अध्यात्म यांचा मेळ घालतं, त्या दृष्टीनं महोत्सवाची यशस्विता तपासणं महत्त्वाचं ठरेल. पुस्तक-खरेदीविक्रीसाठीचं सोयीचं ठिकाण, वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठीचं केंद्र यापलीकडे जाऊन या महोत्सवाचं फलित लाभावं, अशी आपण आशा करू या.

प्रस्तुत अंकासंदर्भात एक बाब येथे नोंदवायची आहे. ती म्हणजे, या नवीन वर्षात येथे 'आम्हां असे अभिमान' हे साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त 'राजहंसी' साहित्यकृतींचा परिचय करून देणारं सदर वाचकांच्या भेटीस येत आहे. त्या जोडीला संवाद 'राजहंसी' लेखकांसोबतचा हे मुलाखतीचं सदरही असणार आहे. आपण याचं स्वागत कराल अशी आशा आहे. 'राजहंसी' पुस्तकांवरील आपले अभिप्राय, लेख आमच्यापर्यंत जरूर पोहचवा. आपल्यातील वाङ्मयीन हार्द वृद्धिंगत होवो, वाचनातून आयुष्य उजळो ही सर्वमंगलाची प्रार्थना करत सर्वांना आंग्ल नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देते.

धन्यवाद.

***डॉ. प्रिया निघोजकर***, कार्यकारी संपादक

## ‘राजहंसी’ विविधा




आध्यात्मिक जीवनदृष्टी आणि त्यातून घडणारी संयमित उपभोगाची जीवनशैली ही हिंदुत्वाची दोन मूलभूत वैशिष्ट्यं. तसं जगणं हे खऱ्या अर्थानं ‘धर्मपालन’! निसर्गरक्षणासाठी उपयोगी ठरणाऱ्या मूळ हिंदुत्वाची युगानुकूल मांडणी करणारं आणि त्याच्या आचरणाचा आग्रह धरणारं हे पुस्तक -

### हरित हिंदुत्व

दिलीप कुलकर्णी

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)


‘वरवर सुखवस्तू, स्थिर आणि सुरक्षित भासणाऱ्या मध्यमवर्गीयांना भूकंपसदृश धक्का देऊन सामूहिक आत्मपरीक्षण करायला लावणारं नाटक!’


*- संपादक व माजी राज्यसभा सदस्य, कुमार केतकर*

### भूमिका

क्षितिज पटवर्धन

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)




औद्योगिक क्षेत्रातील व्यापक अनुभव व प्रदीर्घ अभ्यास, उद्योजकांसोबतच्या उत्तम स्नेहबंधांतून डॉ. अनंत सरदेशमुख यांनी मांडलेले व्यावसायिक यशाचे मर्म, त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्रातील आठ प्रेरक यशोगाथा म्हणजे उद्योजकतेची आकांक्षा बाळगणाऱ्यांसाठी दीपस्तंभच!

### उद्योग यशोगाथा

डॉ. अनंत सरदेशमुख

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

## २०२५मधील पुरस्कारप्राप्त ‘राजहंसी’ साहित्यकृती

*‘विषयाचं वैविध्य आणि आशयाची समृद्धी’ हे ब्रीद सार्थ करत ‘राजहंस’ प्रतिवर्षी आशयसंपन्न साहित्यकृती प्रकाशित करत असते. विविध स्तरांतून त्यांचा होणारा सन्मान हे लेखकासोबतच प्रकाशनासाठीही अभिमानास्पद आहे. दरवर्षी हा आलेख उंचावत असून सन २०२५मध्ये साहित्य अकादमी, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ, महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) या मान्यवर संस्थांसह अनेक प्रतिष्ठित संस्थांच्या तब्बल ८७ पुरस्कारांनी ‘राजहंसी’ लेखकांचा सन्मान झाला. एखाद्या प्रकाशन संस्थेला एकाच वर्षी इतक्या मोठ्या संख्येने पुरस्कार मिळणे ही साहित्य व प्रकाशन क्षेत्रातील विरळ अशी आनंददायी घटना असावी. हे श्रेय आहे आमच्या प्रतिभावान लेखकांचं आणि रसिक वाचकांच्या प्रतिसादाचं. या सुयशाची दृष्टिक्षेपात घेतलेली ही हार्दिक नोंद...*

| अनु. | लेखकाचे नाव | साहित्यकृती | संस्था / पुरस्काराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | सुधीर रसाळ | विंदांचे गद्य रूप | साहित्य अकादमी पुरस्कार |
| २ | माधव गाडगीळ | - | चँपियन ऑफ द अर्थ |
| ३ | माधव गाडगीळ | सह्याचला आणि मी एक प्रेमकहाणी | कै. ना. ह. आपटे पुरस्कार |
| ४ | ..."... | ..."... | डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार |
| ५ | प्रा. प्र. द. कुलकर्णी | आतून उगवलेल्या कविता | साहित्य विहार संस्था पुरस्कार |
| ६ | ..."... | ..."... | कविवर्य वसंत राशिनकर स्मृती पुरस्कार |
| ७ | विलास शेळके | मोगलाई | कै. पार्वती रामचंद्र रायकर |
| ८ | विनया खडपेकर | विवाह नाकारताना | अण्णासाहेब खापर्डे पुरस्कार |
| ९ | ..."... | ..."... | उत्कृष्ट आत्मचरित्र (प्रथम) |
| १० | अंजली चिपलकट्टी | माणूस ‘असा’ का वागतो? | य. खु. देशपांडे स्मृती |
| ११ | दिलीप माजगावकर | वाणी आणि लेखणी | शतकोत्तर द्वितीय पुरस्कार |
| १२ | सुधीर रसाळ / वसंत पाटणकर | वाङ्मयीन युगांतर आणि श्री.पु. भागवत | स्व. गोपाळराव मुकुंदराव देशपांडे |
| १३ | सुरेश वांदिले | १६९५, स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...! | बा. रा. मोडक स्मृती |
| १४ | ..."... | ..."... | शिवांजली साहित्य पुरस्कार |
| १५ | ..."... | ..."... | उत्कृष्ट बाल कादंबरी - प्रथम पुरस्कार |
| १६ | विजय आपटे | हिंदुत्व, मार्क्सवाद आणि भारत | कै. दत्तो वामन पोतदार स्मृती पुरस्कार |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | चंद्रकांत कुलकर्णी | चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे... | लोकमंगल साहित्य पुरस्कार सोलापूर |
| १८ | ..."... | ..."... | दस्तावेज पुरस्कार |
| १९ | ..."... | ..."... | आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी |
| २० | डॉ. गिरीश पिंपळे | ओळख आपल्या विश्वाची | श्रीस्थानक राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार |
| २१ | ..."... | ..."... | डॉ. आनंद दामले पुरस्कार |
| २२ | मुबारक शेख | अजान आणि चालिसा | कविवर्य नारायण सुर्वे पुरस्कार |
| २३ | ..."... | ..."... | राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट काव्य विभाग |
| २४ | डॉ. नंदकुमार राऊत | दौशाड | निळू फुले वाङ्मय पुरस्कार |
| २५ | ..."... | ..."... | मराठी वाङ्मय परिषद,बडोदे |
| २६ | ..."... | ..."... | पद्मगंधा साहित्य पुरस्कार |
| २७ | ..."... | ..."... | सुधा-कुसुम साहित्य पुरस्कार |
| २८ | ..."... | ..."... | महाराष्ट्र साहित्य परिषद, दामाजीनगर शाखा |
| २९ | ..."... | ..."... | मारोतीराव पंडित पुरस्कार |
| ३० | ..."... | ..."... | दत्तात्रय सांडू पुरस्कार |
| ३१ | ..."... | ..."... | उत्कृष्ट आत्मचरित्र |
| ३२ | डॉ. क्षमा शेलार | सवाष्ण | निळू फुले वाङ्मय पुरस्कार |
| ३३ | ..."... | ..."... | सर्वोत्कृष्ट कादंबरी पुरस्कार |
| ३४ | ..."... | ..."... | धनंजय कुलकर्णी पुरस्कार |
| ३५ | स्मिता गौड | माझे शाळेतले प्रयोग | कै. डॉ. कुमुद बन्सल |
| ३६ | ..."... | ..."... | लक्षवेधक पुस्तक २०२४ |
| ३७ | सतीश आळेकर | - | जनस्थान पुरस्कार |
| ३८ | डॉ. अनुराग लव्हेकर | वसुंधरेचे शोधयात्री | कै. सावित्रीबाई वामनराव जोशी पुरस्कार |
| ३९ | ..."... | ..."... | उत्कृष्ट संशोधनपर साहित्य |
| ४० | विलास शेळके | मोगलाई | स्व. राजीव राजोळे पुरस्कार जाहीर |
| ४१ | अभिराम भडकमकर | सीता | उत्कृष्ट कादंबरी (प्रथम) |
| ४२ | ..."... | ..."... | वा. म. पारितोषिक |
| ४३ | ..."... | ..."... | विनायक श्रीधर देशपांडे पुरस्कार |
| ४४ | मन्दार कुलकर्णी | निवडक विश्वसंवाद | भारत गौरव पुरस्कार |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | सुप्रिया राज | काश्मिरीयत | भाई माधवराव बागल पुरस्कार |
| ४६ | सतीश मुटाटकर व यशवंत मराठे | नंदिघोष यात्रा | गोल्डन बुक पुरस्कार |
| ४७ | राजहंस प्रकाशन | मराठी भाषेचा पैस विस्तारण्यात मौलिक योगदान देत असल्याबद्दल | |
| ४८ | विकास गायतोंडे | वस्त्रगाथा | मांडणी पुरस्कार |
| ४९ | ..."... | ..."... | संदर्भ ग्रंथ पुरस्कार |
| ५० | ..."... | ..."... | कृष्ण मुकुंद पुरस्कार |
| ५१ | ..."... | ..."... | वैचारिक -अपारंपारिक |
| ५२ | शैला मुकुंद | अभिषेकी | लक्षणीय साहित्य पुरस्कार |
| ५३ | ..."... | ..."... | कै. सतीशचंद्र दत्तात्रय मोहिले पुरस्कार |
| ५४ | ..."... | ..."... | शतकोत्तर तृतीय वर्ष विशेष पुरस्कार |
| ५५ | शिरीष सहस्रबुद्धे | - | जीवनगौरव पुरस्कार |
| ५६ | वीणा गवाणकर | - | मुक्ता जीवनगौरव पुरस्कार |
| ५७ | राजेश्वरी किशोर | - | जागतिक महिला दिनानिमित्त आरंभ-सक्षम पुरस्कार |
| ५८ | सोनाली कुलकर्णी | सो.. कुल टेक २ | उत्तेजनार्थ ललित विभाग |
| ५९ | डॉ. प्रिया निघोजकर | गोंदणखुणा | मातोश्री इंदुमती शिर्के स्मृती |
| ६० | ..."... | ..."... | साहित्यसम्राट न. चिं. केळकर पुरस्कार |
| ६१ | ..."... | ..."... | ललित गद्य पुरस्कार |
| ६२ | विद्या पोळ-जगताप | बाय गं | उत्तम बंडू तुपे पुरस्कार |
| ६३ | ..."... | ..."... | शंकर पाटील पुरस्कार |
| ६४ | ..."... | ..."... | सर्वोत्कृष्ट स्त्रीवादी साहित्य पुरस्कार |
| ६५ | ..."... | ..."... | स्व. दिवाकर चौधरी स्मृती पुरस्कार |
| ६६ | ..."... | ..."... | करवीर छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार |
| ६७ | ..."... | ..."... | ‘आम्ही लेखिका’ आयोजित ग्रंथपुरस्कार (कादंबरी) |
| ६८ | डॉ. आनंद जोशी / सुबोध जावडेकर | आपले वर्तन-आपला मेंदू | मराठी विज्ञान परिषद, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| ६९ | विवेक गाडगीळ | पाषाणाचे पाझर | लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार<br>दत्तात्रय सांडू पुरस्कार |
| ७० | मुग्धा गोडबोले | टीव्ही, मालिका आणि बरंच काही...! | कृष्णाजी वामन कीर पुरस्कार |
| ७१ | डॉ. संजय तुंगार, सुधीर साबळे | सायबर ॲटॅक | बँकिंग क्षेत्रातील पुरस्कार |
| ७२ | दिलीप कुलकर्णी | - | श्री. ग. माजगावकर पुरस्कार |
| ७३ | संदीपकुमार साळुंखे | - | केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यातर्फे उत्कृष्ट सेवा पदक |
| ७४ | अरुण खोपकर | गुरुदत्त | १० essential books that teach you more than film could यादीत समावेश |
| ७५ | प्रमोद धायगुडे | आबली | दर्याणव कोपर्डेकर राज्यस्तरीय पुरस्कार |
| ७६ | अजित ठोसर | टगी गँग आणि इतर कथा | दत्तात्रय सांडू पुरस्कार |
| ७७ | मृणालिनी चितळे | ज्याचं त्याचं एव्हरेस्ट | दत्तात्रय सांडू पुरस्कार |
| ७८ | दत्ता बारगजे | फकिरी | दत्तात्रय सांडू पुरस्कार |
| ७९ | डॉ. उमेश करंबेळकर | चारा खा, पाणी प्या आणि भूर्र.. | |
| ८० | श्रीधर लोणी | पाकिस्तान का मतलब क्या? | सर्वोत्कृष्ट ऐतिहासिक |
| ८१ | डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग | - | बालआरोग्य व बालकल्याण क्षेत्रातील योगदान |
| ८२ | प्रा. शेषराव मोरे | | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ |
| ८३ | डॉ. सुनील विभूते | मिरॅकल | उत्कृष्ट कथासंग्रह |
| ८४ | शोभा बोंद्रे | माणिक मोती | शतकोत्तर तृतीय वर्ष विशेष पुरस्कार |
| ८५ | अरुण खोपकर | | दिलीप वि. चित्रे जीवनगौरव पुरस्कार |
| ८६ | डॉ. मृदुला दाढे | | भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर स्मृती पुरस्कार |
| ८७ | डॉ. अपूर्वा जोशी | आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग | मनोरमा साहित्य सेवा राज्य पुरस्कार |

*(संकलन साहाय्य : वैशाली जोशी)*

# संवाद ‘राजहंसी’ लेखकांसोबतचा

*‘राजहंसी’ लेखकांचे साहित्य, त्यांची सर्जनप्रक्रिया, त्यामागील प्रेरणा, वाचकांचा प्रतिसाद अशा विविध अंगांनी त्यांच्या लेखनाचे पैलू उलगडणारे हे सदर...*

## काळ्यानिळ्या रेषा - राजू बाविस्कर

*नमस्कार.*

*‘काळ्यानिळ्या रेषा’ हे आपलं ‘राजहंस प्रकाशना’कडून प्रकाशित झालेलं आणि आपलंही पहिलंच पुस्तक. या पहिल्याच पुस्तकानं आपल्याला मराठी साहित्यात ओळख निर्माण करून दिली आहे.*

*मराठी साहित्यातील आत्मकथनांच्या परंपरेत आपल्या या आत्मकथनानं मोलाची भर घातलीय. हे पुस्तक वाचकप्रिय तर होत आहेच; शिवाय आजवर अनेक पुरस्कारांनीही सन्मानित होत आहे. त्याबद्दल प्रथमत: आपलं हार्दिक अभिनंदन. खरं तर तुमचा मूळ पिंड चित्रकाराचा. मग रंगरेषांच्या दुनियेकडून आपण या शब्दांच्या दुनियेकडे कसे वळलात?*

आपण माझं अभिनंदन केलं त्याबद्दल धन्यवाद. ‘राजहंस’कडून पुस्तक प्रकाशित होणं ही माझ्यासाठी आनंददायी घटना आहे. जगण्याचा प्रवास लिहून काढावा, असं काही सुरुवातीला माझ्या मनात नव्हतं. जे जगलो, जे मनात साचून होतं ते माझ्या चित्रांतून मी उतरवत होतो; पण २०१८मध्ये शेगावला भरवलेल्या माझ्या एका चित्रप्रदर्शनात ‘युगवाणी’च्या प्रफुल्ल शिलेदार यांची भेट झाली. पूर्वायुष्यातल्या काही गोष्टी मी त्यांना मोकळेपणानं सांगितल्या. त्या बोलण्यातून त्यांना माझ्या चित्रात दडलेली, दारिद्र्याला तोंड देणारी माणसं दिसली. जगलेला परिसर दिसला. त्यामागील आदिम वेदना दिसली आणि मग ते म्हणाले, ‘‘तू जे बोलतो आहेस, ते जसंच्या तसं लिहून काढ.’’ माझ्यात आत्मविश्वास नव्हता. मी टाळतच होतो. पण त्यांच्या सततच्या पाठपुराव्यानं त्यांनी मला लिहितं केलं. आधी ‘युगवाणी’त काही लेख

छापून आले. स्वतंत्रपणानंही मी काही लिहिलं. मग चित्रांसोबतच माझा लेखनाचाही प्रवास सुरू झाला.

*खरंच हे अगदी विलक्षण आहे. तुमच्या पुस्तकनिर्मितीच्या दृष्टीनं ही क्रांतिकारक घटनाच म्हणावी लागेल. या पुस्तकाला प्रफुल्ल शिलेदार यांनी लिहिलेली प्रस्तावनादेखील खूपच अभ्यासपूर्ण आणि आत्मीय अशी आहे.*

हो. माझं मानस त्यांनी छान उकलून घेतलंय. अशी माणसं आयुष्यात भेटणंही भाग्यच. त्या चित्रप्रदर्शनाचं उद्घाटन वसंत आबाजी डहाके यांनी केलं होतं. एक नागरिक, एक कलावंत म्हणून घडत असलेला माझा प्रवास त्यांनीही पाहिला आहे. माझ्या लेखनाविषयी त्यांनी आत्मीयतेनं लिहिलंय.

*व्वा! जाणत्या साहित्यिकांची शाबासकीची थाप मिळणं, हे नक्कीच या लेखनप्रवासात प्रेरणा देणारं आहे. कोणत्याही जाणत्या वाचकाची पुस्तकवाचनाची सुरुवात होते ती मुखपृष्ठापासून. या पुस्तकाचं मुखपृष्ठ अगदी बोलकं आणि अन्वर्थक आहे. त्याविषयी आपण काय सांगाल?*

या पुस्तकाचं मुखपृष्ठ माझे मित्र विकास मलारा यांनी तयार केलंय आणि त्याच्यावरचं जे सुलेखन आहे ते विजय जैन यांचं आहे. माझा मुलगा निशंक बाविस्कर छायाचित्रकार आहे. त्यानं घेतलेलं माझं छायाचित्र या मुखपृष्ठावर आहे. बालपणापासून मी ट्रंपेट हे वाद्य वाजवत लहानाचा मोठा झालो. आतड्यातला पीळ जाण्यासाठी आणि पोटाची खळगी भरण्यासाठी ती तेव्हाची आमच्या कुटुंबाची मूलभूत गरजच होती. तेच प्रतीकात्मकतेनं मुखपृष्ठावर घेतलंय.

*अच्छा. माणसाचं जगणं त्याच्या अभिव्यक्तीत अस्सलपणानं उतरलं की ते वाचकांच्या काळजापर्यंत पोहोचतंच.*

*सर, आपल्या या पुस्तकाचं वेगळेपण म्हणजे यात आपण अहिराणी आणि आपल्या परिसरातील इतर बोलीभाषांचा सहजतेनं केलेला वापर हे म्हणता येईल. त्याविषयी काय सांगाल...*

माझ्या गावानं, सातपुडा पहाडानं, तिथल्या गोष्टी सांगणाऱ्या बायाबापड्यांनी मला खूप समृद्ध केलंय. ती माणसं कायम माझ्या मनात नांदत आहेत. 'मांगाऊ', 'भिलाऊ', 'तावडी' या सगळ्या अहिराणीच्या जवळ जाणाऱ्याच आमच्या बोली आहेत. एकमेकांना गुप्त संदेश देण्याची आमची एक खास बोली आहे. तिला आम्ही 'पारशी' बोली म्हणतो. याच सगळ्या बोलींमध्ये मी जन्मलो, वाढलो. त्यामुळे तीच भाषा सहजपणे माझ्या लेखनात आलीय.

*खरंय. तुम्हीच जसं म्हणता की, भाषा माणसांना जोडून ठेवते. भाषा तुटली की समूह तुटतो. तुमचं जगणं आणि तुमचं लेखन हे या भाषेमुळेच एकजीव झालं आहे.*

*हे केवळ आत्मकथन नाही, तर त्यात समाजातील वंचित घटकांच्या वेदनेचा उद्‌गार आहे. समाजातील जातव्यवस्था, त्यातून होत असलेलं शोषण आणि मानवी सहसंबंधांचं ढासळत चाललेलं संतुलन याचंही एक अस्वस्थ करणारं चित्रण आहे. ही परिस्थिती आजही जशीच्या तशी आहे की त्यात काही बदल झालाय?*

खूप महत्त्वाचं विचारलं तुम्ही. खरं सांगायचं तर, ही परिस्थिती फारशी बदललेली नाही. माझ्या पुस्तकात जी व्यक्तिचित्रं आहेत, तो जाच, त्रास भोगणारी माणसं आजही आहेत. विशेष म्हणजे ज्यांच्या वाट्याला असं आयुष्य आलंय त्यांनाही त्याचं फारसं काही वाटत नाही. खेड्यापाड्यात विषमतेची मुळं आहेतच. मी शिकलो, त्यातून बाहेर पडलो म्हणून तरी तटस्थ होऊन ते सगळं मांडू शकलो. शिक्षणातून हळूहळू बदल होईल असं वाटतं.

*खरंय. परिपूर्ण शिक्षणानंच समाज बदलतो, विकसनाच्या दिशेनं जातो; ही वस्तुस्थिती आहे. आपण म्हणता तसं आपल्या मनातली अस्वस्थता, समाजातील दाहक वास्तव आपण चित्रांतून मांडलं आणि आता शब्दांतूनही! चित्र आणि शब्द यांपैकी अभिव्यक्तीसाठी कोणतं माध्यम तुम्हाला अधिक प्रभावी वाटतं?*

(थोडं स्मितहास्य करत) आईला आपली दोन्ही लेकरं तेवढीच आवडतात. त्यातून एक निवडणं अवघड आहे. माझ्या चित्रात मी जगलेलो वास्तव आहे; तर माझ्या लेखनामागे वेदनेची चित्रं दडलीयत.

*व्वा! हे किती नेमकं सांगितलंत. अभिव्यक्तीचं माध्यम बदललं तरी व्यक्त होण्याचा आशय एकच असतो. अनेक कलावंतांना हे लागू होतं. आत्मचरित्राला वाङ्‌मयीन मूल्य असतंच, पण ऐतिहासिक आणि सामाजिक मूल्यही असतं. त्या दृष्टीनं आपलं हे आत्मकथन एक महत्त्वाचा सामाजिक दस्तऐवज आहे. यावर आपल्याला अनेक अभिप्राय आले असतील, प्रतिसाद आले असतील. त्यातील एखादा जाणून घ्यायला आम्हाला आवडेल...*

हो. मनाला उभारी देणारे, उत्साह वाढवणारे अनेक अभिप्राय आले. आधी सांगितलं तसं डहाकेसरांनी अभिप्राय दिला. राजन गवस माझे मित्र आहेत. ‘शोषितांचं जगणं मांडणारं, अस्वस्थ करणारं स्वकथन तसंच चित्रविद्रोहाची शब्दबद्ध कथा या शब्दांत त्यांनी या लेखनाची वाखाणणी केली. रानकवी ना. धों. महानोर, दिपक घारे, मनोज पाठक, रंगकर्मी शंभू पाटील, कवी अशोक कोतवाल अशा अनेकांचे आश्वासक अभिप्राय आले.

## 'राजहंसी' विविधा



युद्धाला द्यायला हवा ठाम नकार... या पुस्तकात आहे - युद्धांमागील राजकारण, प्राणघातक शस्त्रास्त्रांच्या शर्यती, अतिरेकी राष्ट्रवादाचे दुष्परिणाम यांसह युद्ध आणि शांतता यांचा सम्यक विचार. तसेच आंतरराष्ट्रीय मुत्सद्दीगिरी, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान आणि इतिहास यांचा युद्धजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने घेतलेला परामर्श...

### युद्ध नाकारणारे जग

संदीप वासलेकर । अनुवाद : डॉ. परिमल माया सुधाकर

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)

माणसात लपलेल्या हिंस्रतेचे अनेकविध पदर उलगडून दाखवणारा, त्याच्यातल्या माणूसपणाचेही दर्शन घडवणारा कवितासंग्रह

### युद्धानंतर...

आदित्य दवणे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)





हा आहे एका संवेदनशील कवयित्रीचा आत्मिक स्वर! तो तिच्या अनुभवांतून उमटलेला. वाचकांना येथे गवसेल निसर्गघटनांचं संवेदनचित्र आणि मानवी भावभावनांचे कवडसे. हे कवडसे ओंजळीत झेलणं म्हणजे आनंद. तेव्हा जरूर वाचा...

### सावलीचे गाणे

विद्या पोळ - जगताप

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

*व्वा! छानच. या पहिल्यावहिल्या लेखनाचं जसं सर्वांनी स्वागत केलं, तसंच दिल्लीच्या 'ललित कला अकादमी'नंही आपल्या चित्रकारितेचा सन्मान केलाय. त्या अनुभवाविषयी सांगा...*

हो. तो अनुभव तर खूपच सुंदर आहे. पण त्याआधी 'भवरलाल आणि कांताबाई जैन फाउंडेशन' यांनी दिलेल्या फेलोशिपमधून मी चित्रकलेचं साहित्य घेऊ शकलो आणि मुंबईत पहिल्यांदाच 'जहांगीर आर्ट गॅलरी'मध्ये माझं चित्रप्रदर्शन भरवू शकलो, हेही मला इथे सांगायला हवं. नंतर मग माझ्या चित्रांना सगळीकडे प्रसिद्धी मिळाली. दिल्लीच्या 'ललित कला अकादमी'नं बासष्टाव्या राष्ट्रीय कला प्रदर्शनात माझ्या चित्रांचा समावेश करून माझा सन्मान केला.

*आपण जळगावला माध्यमिक शाळेत 'कला शिक्षक' होतात. आता निवृत्त झाले आहात. नव्या लेखनाची अनेक बीजं आपल्या मनात असतील. या नव्या लेखनाविषयी काय सांगाल....*

हो, चिंतन सुरू आहे. बापूंवरचं (महात्मा गांधी) एक वेगळं लेखन करतोय. आणखीही काही व्यक्तिचित्रं लिहिली आहेत. उत्स्फूर्ततेनं जे सुचतं ते लिहितो. लिहिण्याचा मी अट्टाहास करत नाही.

*आपल्या या सकस आणि दर्जेदार लेखनासाठी आणि आपल्या वाङ्मयीन वाटचालीसाठी 'राजहंस' परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा. धन्यवाद.*

❖


हे केवळ एका चित्रकाराचे आत्मकथन नाही,
तर हा समाजातील एका वंचित वर्गाचा
अस्वस्थ करणारा उद्गार आहे. व्यक्तिचित्रणाच्या
अंगाने जाणाऱ्या आत्मकथनातून
अंतर्मुख करणारा अस्सल वाचनानुभव...

काळ्यानिळ्या रेषा

राजू बाविस्कर


किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)



अभिनंदन!

## संस्था अनेक - ‘राजहंसी’ मानकरी एक






**बाय गं...**

विद्या पोळ - जगताप

उत्तम बंडू तुपे उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार, म.सा.प. सातारा

शंकर पाटील स्मृती पुरस्कार, म.सा.प. पुणे

साहित्यवलय उत्कृष्ट स्त्रीवादी कादंबरी पुरस्कार, ठाणे

स्व. दिवाकर चौधरी स्मृती पुरस्कार, जळगाव

छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार, अहिल्यानगर

आम्ही लेखिका आयोजित ग्रंथ पुरस्कार

# राजहंसी ग्रंथसृष्टी

## आबली

*‘आबली’ पुस्तक वाचून, त्यातील कथानक ज्या ग्रामीण भागातील आहे आणि ज्या जिल्हा परिषद शाळेतील आहे; तेथे प्रत्यक्ष भेट देऊन घेतलेला हा अनुभव आणि ‘आबली’चे घडवलेले हे मनोज्ञ दर्शन...*

पुस्तक वाचणे म्हणजे स्वत:ला, समाजाला घडवण्याचा आणि जीवन समृद्ध करण्याचा मार्ग आहे. याचेच एक उदाहरण म्हणजे माझ्या वाचनात आलेले प्रमोद धायगुडे यांचे ‘आबली’ हे पुस्तक. विद्यार्थी, शिक्षक, पालक व शिक्षण या घटकांभोवती फिरणाऱ्या या पुस्तकातील कथा संवेदनशीलता व वास्तवता यांचा सुंदर संगम आहेत.

या कथांमधून मुलांची जिद्द, शिक्षणाची आस आणि बिकट परिस्थितीवर मात करीत जगण्याची नवी उमेद अनुभवायला मिळते. अतिशय सुरक्षित व सुखवस्तू वातावरणात वाढलेल्या मुलांसाठी आयुष्याचा संघर्ष काय असतो ते हे पुस्तक सांगते. पुस्तकातील सर्व कथा मनाला स्पर्शून जाणाऱ्या असून या कथा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या प्रेरणादायी आहेत.

संपा आणि बबई या दोन लहान मुलांवर आधारित असलेली ‘पाटी’ कथा वाचली आणि एक वेगळीच हुरहुर माझ्या मनाला लागली. बबई नावाच्या लहान बहिणीचा पाटीचा हट्ट पूर्ण करण्यासाठी करवंदे तोडून ती राजगडावर विकायला संपा जातो, अशी ही कथा आहे. मोठ्या माणसांचा संघर्ष कळून येतो, पण लहान मुलांचा संघर्षदेखील किती मोठा असतो ते ही कथा ताकदीने सांगते. लेखक प्रमोद धायगुडेसरांसोबत या कथेविषयी आणि या भागाविषयी चर्चा केली. कथेतील ‘गुहिणी’ हे गाव वास्तविक गाव असून या गावात लेखकाने प्राथमिक शिक्षक म्हणून आठ वर्षे काम केल्यामुळे तेथील बरेच बारकावे या कथेत आलेले आहेत.

संपा आणि बबई या बहीणभावांचा पाटीसाठीचा संघर्ष वाचून मी कमालीचा अस्वस्थ झालो. त्यामुळे हे कथानक ज्या गावात घडते, त्या गुहिणी गावातील जिल्हा परिषद शाळेतील मुलांना लेखनसाहित्य देण्याचा विचार मनात आला. येथील शाळेचे मुख्याध्यापक श्री. संजय गजामसर व श्री. संतोष भोंडवेसरांशी संपर्क करून याबाबत बोलणे झाले. रायटिंग पॅड, वह्या, चित्रकला वही, कलरपेटी, पेन, पेन्सिली, शार्पनर व खोडरबर हे लेखनसाहित्य एका फोल्डरमध्ये ठेवून प्रत्येक मुलासाठी असे

फोल्डर कीट तयार केले. या भागात पावसाचे प्रमाण खूपच असल्याचे समजल्यामुळे लेखनसाहित्यासोबतच प्रत्येक मुलाला मजबूत अशी छत्रीदेखील देण्याचे मी निश्चित केले. सर्व २३ विद्यार्थ्यांसाठी लेखनसाहित्य, छत्र्या व खाऊ घेऊन मी शनिवार दिनांक २६ जुलै २०२५ रोजी सकाळी ६:३० वाजता सासवडवरून गुहिणीला गेलो. भोर तालुक्यापासून ६० किमी दूर अंतरावर असलेले गुहिणी गाव खूप दुर्गम परिसरात आहे. माझ्यासोबत माझे मित्र अमोल गर्जेसर व लेखक प्रमोद धायगुडेसर हे होते.

सरांनी कथेत वर्णन केल्याप्रमाणे 'भुईची आणि उन्हाची कधीही गळाभेट न झालेली देवबनाची गर्द झाडी, राजगडापासून कोकणकड्यापर्यंत पसरलेल्या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्याचा झाडझाडोऱ्याचा दुर्गम मावळी मुलूख' कधी एकदा भेटेल असे झाले होते.

कथेतील संपा राहत असलेल्या राजगड किल्ल्याच्या संजीवनी माचीच्या पायथ्याच्या गुहिणीची परिस्थिती आणि इतर लोकांसाठी अगदी सहज मिळणाऱ्या गोष्टींसाठीचा संघर्ष मला या कथेच्या भागातील ग्रामीण व शैक्षणिक जीवन प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी खुणावत होता.

हा परिसर अतिशय निसर्गसंपन्न आहे. पावसाचे प्रमाण खूप आहे. पूर येणे, पुरामुळे रस्ते बंद होणे, दरडी कोसळणे अशा गोष्टी या भागात होत असतात. पाऊस सुरू झाला तर आठवडाभर उघडत नाही, पावसाळ्यात बरेच दिवस लाईट नसते. सकाळची एक एसटी असते. त्यानंतर प्रवास करायचा असेल, तर पायपीट ठरलेली असते. संपर्कासाठी क्वचितच मोबाईल रेंज, वैद्यकीय सुविधांचा अभाव या सर्व बाबी मनाला विलक्षण हुरहुर लावीत होत्या. भात व नाचणी या पिकांवर येथील लोक गुजराण करतात. येथील मुले जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेतात; पुढील शिक्षण घेऊन आपल्या आई-वडिलांच्या जीवनसंघर्षाची जाण ठेवून नोकरी-व्यवसायास लागली आहेत, हे ऐकून खूप समाधान वाटले.

गुहिणी गाव ४० ते ५० घरांचे आहे. गावातील तसेच आजूबाजूच्या परिसरातील मुले या शाळेत शिक्षणासाठी येतात. काही मुलांचा रोजचा चार ते पाच किलोमीटरचा डोंगरदऱ्यातून पायी प्रवास या प्रतिकूल परिस्थितीत खूपच कष्टवत वाटत होता.

मुलांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता व निरागसता ओसंडून वाहत होती. शाळेतील शिक्षकांसोबत स्थानिक परिस्थिती समजून घेताना येथील भौगोलिक परिस्थितीबरोबरच पालकांची गरिबी व त्यांच्या जीवनसंघर्षाची कल्पना आली.

सोबत आणलेल्या भेटवस्तू, शैक्षणिक साहित्य व गोड खाऊ मुलांना वाटला. सर्व मुले खूश झाली. मुलांशी आम्ही गप्पागोष्टी केल्या. इयत्ता दुसरीतील पूनमने गायलेली गाणी मनाला भावली. काही मुलांनी कविता व पोवाडा सादरीकरण केले. तेही दर्जेदार होते. आठवण म्हणून शाळा परिसरात आम्ही आणलेले सोनचाफ्याचे एक झाड लावले.

स्वत: श्री. प्रमोद धायगुडेसर या वेळी आमच्याबरोबर होते. धायगुडेसरांनी आपल्या

नोकरीची सुरुवात प्राथमिक शिक्षक म्हणून याच गावात केली. आठ वर्षे ते या शाळेत ज्ञानदानाचे काम करीत होते. त्यांची माजी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांच्याशी जोडलेली नाळ आम्हास जाणवत होती. बदली होऊन खूप वर्षांनीदेखील एका शिक्षकाबाबत गावातील लोकांमध्ये इतका आदरभाव, आपुलकी ही धायगुडेसरांसाठी शिक्षक म्हणून केलेल्या कामाची पावती तर होतीच; पण त्यांच्यातील एका समाजशील व्यक्तिमत्त्वाची प्रचितीदेखील देणारी होती.

शाळेतील मुलांकडे पाहून संपा व बबई ही कथेतील पात्रे वारंवार डोळ्यांसमोर येत होती. कथेतील वर्णने डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहत होतो, क्षणोक्षणी अनुभवत होतो.

शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीतील ग्रामस्थ जरी गरीब असले तरी मनाने, आचारविचाराने फार समृद्ध व श्रीमंत आहेत. येथील लोकांशी हितगुज करण्याचा योग आला. गुहिणीतील शाळेच्या, तेथील ग्रामस्थांच्या, पालकांच्या खूप साऱ्या आठवणी घेऊन आम्ही माघारी आलो.

आबलीसारखे पुस्तक तुमच्या संवेदना जागृत करते. या पुस्तकातील पात्रे असणाऱ्या मुलांना प्रत्यक्ष भेटणे, त्यांना साहाय्य करणे हे आत्मिक समाधान देणारे आहे.

एखादे पुस्तक साधारण नसते. ते जीवनातील वास्तव मांडते. जीवनासाठीचा संघर्ष शिकवते, समाज घडवण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडते. आबली या छोट्याशा पुस्तकामुळे मला वेगळ्या जगाचा अनुभव मिळाला. अशी पुस्तके व ते लिहिणारे लेखक यांची समाजाला नितांत गरज आहे.

***अविनाश महादेव जाधव***, सासवड
९९२२९६१२५०

मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढावी, म्हणून
जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अनेक अभिनव उपक्रम
राबविणाऱ्या एका शिक्षकाने लिहिलेल्या या कथा!
स्थानिक बोली अन् ग्रामीण मातीचा गंध असलेल्या,
ग्रामीण आयुष्याचे अनेक पदर
वाचकांसमोर आणणाऱ्या...

आबली

प्रमोद प्रकाश धायगुडे

किंमत : ₹ १००/- । (ट.ख. ₹ ५०)



# कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या

*युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला नेहमीच प्रेरणादायी व वंदनीय आहेत. सुहास बहुळकर यांच्या सूक्ष्म अभ्यासातून व अथक परिश्रमांतून साकारलेले हे पुस्तक मराठी माणसासाठी एक मौलिक ऐवज ठरणार आहे.*

हिंदुहृदयसम्राट (कै.) बाळासाहेब ठाकरे हे विख्यात व्यंगचित्रकार होते, त्यांनी एके ठिकाणी जाहीर व्याख्यानात म्हटले होते की, लिहिलेल्या हजारो शब्दांपेक्षा एका चित्रातून वाचकांपर्यंत विषयाचा आशय पोहोचू शकतो, ही चित्रांची आणि चित्रकारांच्या हाताची ताकद मोठी असते.

शब्दांपूर्वी वृक्षांच्या पानांवर पर्णलेख, चित्र, शिल्प अर्थात शिलालेख किंवा वीरगळ हेच अभिव्यक्तीचे प्रकार होते. त्या माध्यमातून समाजातील संवादाची पद्धत रूढ झाली होती. त्या-त्या काळाचा संदर्भ शोधताना ही चित्रे आणि शिल्पे आपल्याशी संवाद साधतात. काळावर ठसा उमटवणारी लोकोत्तर युगपुरुषाची चित्रे व शिल्पे रेखाटून किंवा कोरून कलेच्या आविष्कारातून त्या त्या महापुरुषांना किंवा युगपुरुषांना आजही साजिवंत ठेवले आहे. इतिहासाच्या तसेच समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी या चित्रांचा तसेच शिल्पांचा सखोल अभ्यास करून इतिहासाला जणू बोलके केले आहे.

युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला नेहमीच प्रेरणादायी व वंदनीय आहेत, म्हणूनच आज चारशे वर्षे होत आलीत तरी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमा घराघरात पूजनीय आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांना आपण आजवर अनेक रूपांत पाहत आलो आहोत. बालपणी जिजाऊंकडून रामकृष्णाच्या कथा ऐकणारे, रायरेश्वराच्या मंदिरात आपल्या सवंगड्यांच्या सोबत स्वराज्याची शपथ घेणारे, तोरणागड सर करून स्वराज्याचे तोरण बांधणारे, अफझलखानाचा कोथळा बाहेर काढणारे, लाल महालात शाहिस्तेखानाची बोटे छाटणारे, मिर्झा राजे जयसिंगांशी तह करणारे, आग्र्याच्या कैदेत असलेले आणि शिताफीने सुटका करून घेणारे, काशीहून गागा भट्टला आणून राज्याभिषेक करवून घेणारे, राजसदरेवर मसलत करणारे, दरबारात न्यायदान करणारे, रणांगणात गनिमांवर तुटून पडलेले, हिरकणीच्या धैर्य व साहस यांचे कौतुक करणारे अशी एक ना अनेक रूपे आपण पाहतच लहानाचे मोठे झालोत; ही प्रेरणादायी शिवरूपे आपल्यापर्यंत ज्या चित्रकारांनी पोहोचवलीत, त्यातीलच एक सव्यसाची चित्रकार सुहास बहुळकर यांनी ‘कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या’ हा बहुमोल ग्रंथ नुकताच

तमाम शिवप्रेमींसमोर पेश केला आहे. या चित्रकारांची प्रेरणा, त्यांचा संघर्ष, त्यांना लाभलेले सहकार्य यांबाबत सुप्रसिद्ध इतिहासकारांचा इतिहास पुढे आणण्याचे मोठे काम प्रस्तुत ग्रंथातून झाले आहे. या निमित्ताने चित्रकार बहुळकर यांची लेखक व संशोधक ही नवीन ओळख निर्माण झाली आहे. छत्रपतींच्या पहिल्या चित्राच्या कथेपासून ते अलीकडच्या शिवस्मारकाच्या व्यथेपर्यंतचा प्रवास बहुळकरांनी मांडला आहे. सुरुवातीच्या काळात शिवरायांचे म्हणून इब्राहिम खान नावाच्या भलत्याच व्यक्तीचे चित्र सगळीकडे वापरले जायचे, हे सांगून बहुळकर पहिला धक्का देतात. वा. सी. बेंद्रे यांनी ती चूक कशी दुरुस्त केली, हेही ते सांगतात. बहुळकरांनी केलेले संशोधन, त्यांनी दाखवलेले शिवचित्रांतील बारकावे पाहून थक्क व्हायला होते. हे पुस्तक आपल्याला थेट शिवकाळात नेण्याचा प्रत्यय देते.

सुप्रख्यात चित्रकार राजा रविवर्मा, महादेव विश्वनाथ धुरंधर, दीनानाथ दलाल, ग. ना जाधव, ए. एच. मुल्लर, शरद कापूसकर अशा दिग्गज चित्र-शिल्पकारांचा शिवचरित्र निर्मितीचा इतिहास सांगताना बहुळकरांनी त्यांचे स्वभाव, त्यांची कौटुंबिक, तसेच सामाजिक पार्श्वभूमी यांवरही प्रकाश टाकला आहे. या चित्रकारांच्या चित्रांतील वैशिष्ट्यांतील फरकही नेमकेपणाने मांडला आहे.

कोल्हापुरातील शिवछत्रपतींच्या पुतळ्याच्या निर्मितीची थरारक कथा हे पुस्तकाचे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. ब्रिटिश गव्हर्नर विल्सन याचा संगमरवरी भव्य पुतळा तत्कालीन स्वातंत्र्यसैनिकांनी फोडला व विद्रूप केला, त्याच जागी छत्रपती शिवरायांचा पुतळा बसविण्याची कल्पना चित्रमहर्षी भालजी पेंढारकर यांनी

देशविदेशातील असंख्य कलाकारांनी
आपापल्या कलांतून छत्रपती शिवाजी महाराज घडवले.
त्या कलाविष्कारांमागील संघर्षकथाही तितक्याच लक्षणीय.
अशा असंख्य कथांचे आणि तशाच व्यथांचे
हे अनोखे संकलन म्हणजे
इतिहास, चित्रकला आणि शिल्पकला या तिन्ही
क्षेत्रांतील असंख्य मान्यवरांच्या अतुल कार्यकर्तृत्वाला
दिलेली मानवंदनाच आहे!




कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या

सुहास बहुळकर

किंमत : ₹ १०००/- । सवलतीत : ₹७५० । (ट.ख. ₹ ८०)

मांडली आणि अवघ्या २० दिवसांत हा पुतळा उभा करण्याचे काम कलामहर्षी बाबुराव पेंटर, शामराव डोंगरसाने व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. शिल्पकलेच्या इतिहासातील ही दुर्मीळ घटना म्हणावी लागेल. बहुळकरांनी डोंगरसाने यांच्या रोजनिशीचा आधार घेऊन ही कथा सांगितली आहे. शिवरायांचा अश्वारूढ पुतळा साकारण्यासाठी जेजेच्या डीनच्या कार्यालयाचा ताबा घेऊन डीनलाच कार्यालय बंदी करणारे, संस्थानिकांना आपल्या तालावर नाचायला लावणारे प्रतिभावंत चित्रकार देऊसकर यांच्याविषयीची लेखकाने दिलेली माहिती रंजक आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला शिवचित्रे व शिवशिल्पांनी कशी प्रेरणा दिली, याचा लिहिलेला इतिहासही वाचनीय आहे. शिवराज्याभिषेक सोहळ्याचे चित्र काढण्यासाठी दीनानाथ दलाल यांनी घेतलेली मेहनत आणि ते चित्र विकण्याची वेळ आली तेव्हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी केलेली मदत हा प्रसंग भावुक करून जातो. अशा असंख्य कथा-कहाण्या वाचकांच्या मनाची पकड घेतात, शिवाय या सगळ्यांबरोबर बहुळकरांनी पुस्तकात मांडलेली अरबी समुद्रातील शिवस्मारकाची व्यथा वाचून मन व्याकुळ होते. या पुस्तकाच्या पानापानांत बहुळकरांचा सूक्ष्म अभ्यास व त्यांनी घेतलेले कष्ट प्रकर्षाने दिसून येतात. या 'कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या' वाचून प्रत्येक शिवप्रेमीनी आणि इतिहासप्रेमीनी ज्वलंत असा वाचनानंद घ्यायलाच हवा, असे हे मौलिक पुस्तक आहे, इतिहासाच्या, समाजशास्त्राच्या तसेच राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना हा ग्रंथ उपयुक्त ठरेल..!

***डॉ. सुनीलकुमार सरनाईक***, कोल्हापूर
९४२०३५१३५२




विकास, धरणे आणि त्यामुळे उद्‌ध्वस्त होणारं
ग्रामीण जीवन! त्यामुळे होणारं स्थलांतर!
त्यापायी गाव आणि देव पाठीवर बांधून चाललेल्या
हजारो धरणग्रस्तांची मन सुन्न करणारी,
साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबरी.

झाडाझडती

विश्वास पाटील

आवृत्ती सत्ताविसावी । किंमत : ₹ ५२५/- । (ट.ख. ₹ ५०)

## आम्हां असे अभिमान

साहित्यक्षेत्रातील सन्मानाच्या ‘साहित्य अकादमी पुरस्कार’प्राप्त ‘राजहंसी’ साहित्यकृतींचा जागर...

*सन १९९१मध्ये विश्वास पाटील लिखित ‘झाडाझडती’ ही कादंबरी ‘राजहंस’ने प्रकाशित केली आणि सन १९९२मध्ये या कादंबरीस ‘साहित्य अकादमी पुरस्कार’ प्राप्त झाला. आजपर्यंत सत्तावीस आवृत्त्या निघालेली ही एक वाचकप्रिय साहित्यकृती आहे. वाचकाचे भावविश्व, भाषिक जाण आणि समाजजीवनाविषयीची समज व्यापक करणारी ही कादंबरी संग्राह्य अशीच आहे.*

### झाडाझडती

*विश्वास पाटील हे मराठी साहित्यसृष्टीतील ऐतिहासिक व सामाजिक वास्तवाचे समग्र भान असलेले व आपल्या साहित्यातून त्याची प्रभावी मांडणी करणारे एक महत्त्वाचे साहित्यिक आहेत. त्यांची ‘झाडाझडती’ ही साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी ‘धरणनिर्मिती’ या एका घटनेच्या अवतीभोवती असलेल्या विविध क्रियाप्रतिक्रियांचं चित्रण असलेली, त्यासोबतच ग्रामीण समाजरचनेतील, मानवी जीवनातील बदल प्रत्ययकारितेने टिपलेली महत्त्वाची कादंबरी आहे. काळाचा विशाल पट तिने कवेत घेतलेला नसला तरी पात्र, घटना, प्रसंग, प्रदेश वर्णन, वातावरण चित्रण, प्रतिमा प्रतीकांची योजना आणि निवेदन यांच्या एकजिनसी संघटनेतून कादंबरीच्या अवकाशाची विशालता आपल्याला जाणवते.*

*या कादंबरीच्या कथानकातील अनुभव अस्सल आहेत. झाडे, वनसंपदा व जमीन या संसाधनांवर चालणाऱ्या वेगवेगळ्या हितसंबंधांच्या संघर्षातून कादंबरीचे ताणतणाव वाचकांसमोर येथे उलगडत जातात. पाटील यांच्या लेखनशैलीतील वास्तववादी चित्रणामुळे आणि व्यापक सामाजिक जाणिवेमुळे वाचक कथानकात गुंतून राहतो. भाषेतील स्थानिक बोलीचा वापर केलेला आहे. साधे व सरळ, परंतु परिस्थितीने झाकोळलेले लोक या कादंबरीत प्रभावीपणे उभे राहतात. त्यांच्या संघर्षातून सत्ताकेंद्रांची भ्रांत, शासकीय यंत्रणेचे दुटप्पी रूप आणि पर्यावरणाविषयीचा उदासीन दृष्टीकोन प्रकर्षाने जाणवतो. एका धरण घटनेशी जोडलेले कथासूत्र केवळ पर्यावरणसंरक्षणापुरते सीमित न राहता सामाजिक न्याय, विकासाची संकल्पना आणि निसर्गाशी असलेली*

*मानवी जबाबदारी यांवरील प्रश्न उपस्थित करते. यामुळे 'झाडाझडती' ही केवळ कथा न राहता एक चिंतनपर साहित्यकृती ठरते.*

*विश्वास पाटील यांच्या शैलीतला संशोधनाधिष्ठित दृष्टिकोन, प्रभावी कथनशैली आणि ग्रामीण जीवनाचे अस्सलपण यांमुळे या कादंबरीने समकालीनतेसोबतच मराठी साहित्यात सार्वकालिक स्थान मिळवले आहे. त्यामुळेच आजही ती वाचनीय ठरते.*

*या कादंबरीतील हा एक संपादित अंश...*

---

आवडाई झिजायला लागलेली. अंगातला ताप निघत नव्हता. हैबतीची छबी डोळ्यांपुढं उभी राहायची. गुणवंता आणि फुला रात्रंदिवस उशापायथ्याशी बसून होते. दवापाणी चालू होता. पण आवडाईचं मन कशातच नव्हतं. नुसतं झुरायचं. ''हैबतीऽ हैबाऽऽ'' म्हणीत जप करायचा. खैरमोडे गुरुजींची शेवंती वरचेवर यायची. गावठाणातली पोरं घिरट्या घालायची. समजवायची. पण आवडाईची उठायची लक्षणं नव्हती. जिवाला असंच लावून घेतलं तर आवडाई जाणार हे पोरांनी ओळखलं.

पोस्टमार्टेमचा अहवाल आला होता. त्यापाठोपाठ व्हिसेराची तपासणी आली. कधीही दारूचा घोट न शिवणाऱ्या हैबतीच्या पोटात अल्कोहोल आढळलं होतं. गावठाणानं धीर सोडलेला. खून पचणार. आरोपी सहीसलामत सुटणार. नलवडेंनी गुन्हा नोंद केला तरी आरोपींना अटक झाली नव्हती. आरोपी फरारी झाल्याचं सांगितलं जात होतं.

म्हाकूचं डोकं कामातून गेलेलं. गावठाणाशी खैरापुरानं उभा दावा मांडलेला. एक पंढरी पाटील सोडता धरणग्रस्तांच्या बाजूला कोणी उभं राहत नव्हतं. मधल्या आंबेपूरच्या मोर्चानं काही पदरात पडलं नव्हतं. गावाची राखण करणारे खैरमोडे गुरुजी तर मागंच जग सोडून गेले. ज्याच्या उभ्या आयुष्याचं वाळवण झालं, त्या हैबतीलाही वाईट मरण आलं. धरणग्रस्तांना न्याय नाही. सत्ता विरोधी, कायदा फितूर. ज्यांनी आमचा बळी देऊन लाभ हाणला ते बेमान. आवडाईचा डोंगरासारखा आधार वाटायचा. तीही हैबतीच्या दु:खानं गळून गेलेली– कुणाकडं बघायचं आम्ही? असंच कुथत मरण्यापेक्षा सूड घेऊन मरू. काय अर्थ आहे या लाजमोड्या जिण्याला?

इठलाईचा आंबा रातचा गारठून गेलेला. त्याचा अंधारा बूड धरून गावठाणातली पोरं बसलेली. म्हाकू, बाबू, दामज्या, गणू, शिवा सारीच तरणी पोरं गोळा झालेली. बाजूला अंधार धरून गोम्या बसला होता. पोरांचं अंग रसरसत होतं. माथी बिघडून बिथरून गेलेली. धमन्या पेटलेल्या. पोरांची सारी तयारी झालेली. रॉकेलचा डबा, चार दिवट्या आणि निधड्या छातीची पंचवीसभर पोरं. राघू पोलिसांना सापडत नाही काय? तो तर गावाबाहेरच्या नव्या बंगल्यात झोपलाय. त्याच्या दारातली फटफट, जीप, बैल, बारदाण, बंगला काही शिल्लक ठेवायचं नाही. घरातल्या माणसांसकट सारीच आगीच्या पोटात गेली पाहिजेत. अजून थोडी रात्र वाढू द्यावी आणि राघूचा बीमोड करावा.

खोपटाचं दार वाजलं. पाठोपाठ गोम्या कोळ्यानं दार दाणदिशा उघडलं. तो आवडाईच्या अंथरुणाजवळ आला आणि ‘‘अशानं असं’’ चाललंय म्हणून सांगू लागला. आवडाई झटकन भानावर आली. क्षणभर गळून गेलेलं अंग विसरली. तिनं गुणवंताचा हात जोरानं हातात धरला. ‘‘देवा लाडूबाऽऽ मास्तरापाठूपाठ मीबी वर गेली तर ह्या भडकल्यालं पोरांचं काय हुणार –अशाच आगी – अशीच जाळपोळ?’’ उठता येत नव्हतं. तिनं गुणवंताला सांगितलं, ‘‘लेकरा, मार मला पाठुंगळीवरऽऽ चल झाटदिशाऽऽ.’’ पाठीवर आवडाईला मारून गुणवंता पांदीनं धावू लागला.

अमनधपक्या आवडाई पुढं आल्याचं बघून इठलाईच्या आंब्याचा नूर पालटला. आवडाईनं म्हाकूला जवळ बोलावला. त्याच्या रसरसत्या अंगावर आपला हात ठेवीत तिनं विचारलं, ‘‘लेकराऽ, काय करायला निघालास तू हे? हे वंगाळ वागणं.’’

‘‘ह्याबिगार इलाज नाय, आये.’’

‘‘काय हुणार हाय यातनं?’’

‘‘राघूचा वंशाखंड हुईल.’’

‘‘त्येचा एकट्याचा? असं हजार राघू हायत खैरापूरच्या झाडावर. गावठाणातली ही पिलं उरतील का त्येंच्या चोचीपुढं? येडा विचार सोडा. तुमच्या गुन्याचा लगीच तपास लागंल. जाल फासाच्या दोरीवर. काय हुईल या गावठाणाचं? केळापूरसाठी कोण झगडणार? आडगावला कोण वाचीवणार? म्हाकूऽऽ खैरमोडी मास्तराची आण हाय. येडा इचार सोड.’’

म्हाकूला राहवलं नाही. आवडाईच्या गळ्यात पडून तो ढसाढसा रडला. गदगदून आलेल्या ढगाचा निचरा झाला. तो आवडाईवर डाफरला, ‘‘तू आंथरून धर आन् आमाला जगायच्या बाता शिकव.’’

‘‘ठकली मी.’’

‘‘कशानं? एक हैबती गेला म्हणून? ही गावठाणातली बाकीची लेकरं तुजी न्हाईत का?’’

आवडाई चमकली. म्हाकूच्या बोलाबरोबर तिचं निम्मं दुखणं पळून गेलं. पाऊसवाऱ्याशी झट्या देणारी गोइंदाची आवडाई जागी झाली. मंत्र्याचं ताट उधळणारी आवडाई डिवचली गेली. खैरमोडे मास्तराला दिलेलं वचन जागलं. अंगात बळ संचारलं. सारं गावठाण आपल्या आईकडं आशेनं बघू लागलं. पुढच्या धोरणाची बोलणी सुरू झाली. शेवंतीनं कुठंतरी ऐकलेली बातमी सांगितली.

‘‘पंधरा दिसानं मुख्यमंत्री जांभळी कॉलनीवर येणार हाय म्हणत्यात. तिथंच गाठू त्याला.’’

‘‘बराबर हाय.’’ सारी पोरं ओरडली, ‘‘आतापासूनच तयारी करू. ह्याच मुहूर्तावर जांभळी कॉलनी कोंडल्याबिगार न्याय नाय गवसणार.’’

❖

अभिनंदन!

## मनोरमा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार, सोलापूर



मनोरमा राज्यस्तरीय
साहित्य सेवा पुरस्कार

**आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग**

◆

डॉ. अपूर्वा जोशी




अभिनंदन!

## विदर्भ साहित्य संघ, नागपूर


शतकोत्तर तृतीय वर्षातील विशेष पुरस्कार (२०२४-२५)



**अभिषेकी**

◆

शैला मुकुंद




---



**माणिक मोती**

◆

शोभा बोंद्रे




अभिनंदन!

## माय होम इंडिया आणि
## एम.आय.टी. स्कूल ऑफ लिबरल आर्ट्स
## (MIT World Peace of University)
## यांच्या संयुक्त विद्यमाने

भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर स्मृती पुरस्कार








**सुरांची सम्राज्ञी लता मंगेशकर**

डॉ. मृदुला दाढे

**नवरसांचा जादूगार मोहम्मद रफी**

अभिनंदन!


## महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे



डॉ. आनंद दामले पारितोषिक

**ओळख आपल्या विश्वाची**

डॉ. गिरीश पिंपळे



## ‘राजहंसी’ विविधा



भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना, आजवरचा प्रवास, भूमिका आणि कार्यपद्धती, भारतासारख्या खंडप्राय विशाल देशाच्या वाटचालीत असलेला महत्त्वपूर्ण सहभाग यांचा रोचक इतिहास, तोही अत्यंत रंजक पद्धतीने...

### गोष्ट रिझर्व्ह बँकेची

विद्याधर अनास्कर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)


भारतीय रंगमंचावरील कर्तबगार रंगकर्मी, दिग्दर्शिका, अभिनेत्री, लेखिका या विविधांगी भूमिकेतील स्त्री-कलावंतांच्या व्यक्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा वेध... वीस दिशादर्शक प्रश्नांच्या अनुषंगाने सर्जनशील रंगकर्मींचे हे विचार म्हणजे वाचकांसाठीचा समृद्ध ठेवा...

### वीस प्रश्न

संकल्पना आणि संकलन : महेश एलकुंचवार

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)




औद्योगिक क्षेत्रातील व्यापक अनुभव व प्रदीर्घ अभ्यास, उद्योजकांसोबतच्या उत्तम स्नेहबंधांतून डॉ. अनंत सरदेशमुख यांनी मांडलेले व्यावसायिक यशाचे मर्म, त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्रातील आठ प्रेरक यशोगाथा म्हणजे उद्योजकतेची आकांक्षा बाळगणाऱ्यांसाठी दीपस्तंभच!

### उद्योग यशोगाथा

डॉ. अनंत सरदेशमुख


किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# असे जन्मले पुस्तक

## जीवदान

ऑक्टोबर २०१७ला मी व्हायरल न्यूमोनियाने आजारी होतो. २ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर २०१७पर्यंत नाशिकच्या एका इस्पितळातल्या अतिदक्षता विभागात (आयसीयूमध्ये) मला इलाजासाठी ठेवलेले होते. डॉक्टरांनी माझ्या कुटुंबाला सांगितले होते, 'आम्ही प्रयत्न करू पण पेशंट जगण्याची शक्यता कमी आहे. कदाचित व्हेंटिलेटरवर ठेवावे लागेल वगैरे.'


या आजारात केव्हा मी अर्धजागृत अवस्थेत असायचो, तर केव्हा मला भयानक स्वप्ने पडायची. वेगवेगळे भास व्हायचे. डोळ्यांसमोर काहीतरी वेगळेच फिरत असायचे. अर्धजागृत अवस्थेत काहीतरी विचार घोळायचे. जसजशी माझी प्रकृती सुधारू लागली, तसतसे आधीचे आणि आताचे वेळोवेळी झालेले भास मुद्दाम आठवू लागलो. असे असंख्य भास, वेळोवेळी दिसलेली स्वप्ने आणि थोडीफार लक्षात राहिलेली स्वप्ने, कुठेही धडकणारे कसेही विचार माझ्याकडून शक्यतो विसरले जाणार नाहीत याची काळजी घेत मुद्दाम स्वत:शी आठवत राहिलो. अशा बऱ्याच स्वप्नांत आणि डोक्यात वेगळेच काहीतरी होत असलेल्या विचारांत प्रामुख्याने लहानपणातील माझे गाव होते, माझे लहानपण होते, माझ्या गावाचा परिवेश होता, मित्र होते, गावातले लोक होते, काही घटना होत्या, माझी मातृभाषा अहिराणी होती आणि शक्यतांच्या पलीकडले, जे कधी घडलेच नाही तेही होते. असे आदिबंध, नेणिवेतल्या तळाशी साचलेल्या बऱ्याच अद्‌भुत बाबी, वास्तवाशी संबंध नसलेल्या गोष्टी घडताना दिसत होत्या. हे सर्व मनातल्या मनात अगदी ठरवून घोकत- आठवत- पाठ करत राहिलो, कारण माझ्यातला लेखक - माझ्यातली प्रतिभा, परकायाप्रवेशाची माझी क्षमता मला ही स्वप्ने जपून ठेवायला सांगत होते. केवळ बीजच नव्हे, तर एका फिक्शनचा बराचसा मोठा भाग माझ्या हाती लागत होता. जगलो वाचलो तर हे सर्व लिहून काढेन, असे मनातल्या मनात म्हणत जाणवलेले, न



जाणवलेले, काळे-पांढरे अवास्तव-अतिवास्तव फिक्शन मी कुरवाळत राहिलो.

आजारातून बरा होत घरी आलो. फक्त अशक्तच नव्हे, तर खूप कृश झालो होतो. पूर्ण बरा होण्याची वाट न पाहता मनात साचलेली सर्व अद्‌भुत स्वप्ने आणि स्वप्नसदृश्य बरेच काही सगळे एकामागोमाग लिहून काढले. Fantasy - स्वप्नजग - कल्पनारम्य असे आठवत असलेल्या सगळ्या भासांचा पहिला खर्डा लिहायला १५ दिवस गेले. लिहिलेले बाड वाचून पाहिले, त्यातून काहीच अर्थबोध होत नव्हता. अनेक घटनांना अजिबात सलगता नव्हती. पण हे सर्व लिहून काढले होते. वाचता वाचता त्यातलेच नवे काही लक्षात येऊन त्या लिखाणात भर पडत होती. हे स्वप्नात आलेले- जाणवलेले- भासलेले वेगळे काहीतरी आहे, याचे भान होते. हे असेच टाकून देणे योग्य नाही, असे वाटत असतानाच एका स्वप्नाशी दुसऱ्या स्वप्नाचा काहीही संबंध नव्हता हेही कळत होते. पण लिहीत राहिलो. लिहिलेले वाचत राहिलो. हे मुळात एका कलाकृतीचे फिक्शन आहे, असे मला आत वाटू लागले होते. ह्या फिक्शनला योग्य तो आकार देऊन, कादंबरीत शब्दबद्ध करून याला उजेड दाखवायला हवा; असे आतून वाटत होते. बरेचसे असे आठवले ते ते लिहून झाले होते. लिहून झालेल्यापेक्षा विसरून गेलो ते अजून खूप जास्त होते. पण जे आठवत गेले ते भराभर लिहून काढले होते. बऱ्याच गोष्टी आठवत असलेली स्वप्ने लिहिता लिहिता आठवत गेल्या, तेही लिहीत राहिलो. शेवटी अशा बऱ्याच 'गोष्टी' म्हणता येतील असे सूत्र नसलेले फिक्शन तयार झाले.

आता हे फिक्शन फक्त कादंबरी ह्या घाटातून आकाराला येऊ शकत होते. तशा वेगवेगळ्या कथाही यातून जन्माला येऊ शकल्या असत्या; पण आजारपणातला हा भासमान एकूण अनुभव आपण कादंबरीतून मांडू, असे आतून वाटत होते. म्हणून हे सगळे एका सूत्रात कसे मांडता येईल याचा विचार करू


पंचक्रोशीतला वतनदारांचा वाडा. वैभवशाली, सालंकृत लक्ष्मीसारखा देखणा... वाड्यात अधूनमधून दिसणारा मूळपुरुष नाग... आणि घरातल्या कर्त्या, सवाष्ण स्त्रियांना अल्पायुष्याचा शाप... काळाच्या कुपीत दडलेली रहस्यं उलगडत जाणारी कादंबरी.

सवाष्ण

डॉ. क्षमा गोवर्धने शेलार

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)

लागलो. वास्तवात, गावात, परिवेशात जसेच्या तसे अनुभवलेले नव्हे; पण आजारपणात मला झालेले भास, पडलेली स्वप्ने हा व्यक्तिगत माझा अनुभव होता. ही ऐकलेली अथवा दुसऱ्याला दिसलेली स्वप्ने नव्हती आणि अशा घटना बाहेर एखाद्यासोबत जशाच्या तशा घडल्या असेही काही झालेले नव्हते. म्हणून ही कादंबरी प्रथमपुरुषी एकवचनी म्हणजे नायकच सांगत आहे, नायकच बोलत आहे, आणि नायक हा आत्मचरित्रात्मक 'मी' म्हणून बोलतो आहे; अशी रचना कादंबरीची केली तर ती अधिक स्वीकारार्ह होईल, अधिक भावेल, असे वाटले. मला असे असे स्वप्न पडले, असे सांगण्याऐवजी ते स्वप्न हे स्वप्न म्हणून नाही तर 'मी' सांगत आहे, अशी रचना जास्त परिणामकारक होईल असे वाटल्याने जाणूनबुजून हा फॉर्म निवडला. स्वप्नात- अर्धजागृत अवस्थेत मला या घटना वेगळ्या प्रकारे दिसत असल्या, तरी यांतले अनेक लोक हे त्यांच्या नावासहित ओळखत असलेले माझ्या लहानपणी पाहिलेले गावातील लोक जशेच्या तसे दिसायचे, महिला दिसायच्या, लहानपणातले माझे सोबती दिसायचे. असे लिहून झालेली अनेक स्वप्ने एकमेकांशी जोडत, ठरवून ही कादंबरी लिहायला सुरुवात केली. आणि हे सगळे विचारांती मी एका सूत्रात बांधायला यशस्वी ठरलो.

पहिले लिखाण २०१८ला पूर्ण झाले. त्यानंतर काही दिवस कादंबरीकडे पाहिलेच नाही. २०१९ला पुन्हा हे लिखाण वाचत त्याचे पुनर्लेखन केले. ह्या पुनर्लेखनातून मला जशी हवी तशी कादंबरी पूर्ण झाली. लिहिताना कादंबरीत कौटुंबिकता, सामाजिकता, मानवी संबंध, नाते, आकर्षण, वासना, मानवी आचारसंहिता आणि निर्लज्जपणा, लोकसंस्कृती, लोकजीवन आपोआप येऊन गेले होते. कादंबरीला 'जीवदान' नाव बहाल केले. कादंबरी अजून काही काळ तशीच पडू दिली. २०२० ते २०२२ हा कोरोना काळ होता. या काळातही इतर

नव्याने रुजू झालेला तरुण, तडफदार इन्स्पेक्टर धनेश...
गावातील प्राचीन शिवमंदिर नि त्याविषयीच्या
आख्यायिका... एकामागोमाग एक घडणाऱ्या
रहस्यमय घटना... धनेश त्याच्या गुप्त 'मिशन'मध्ये
यशस्वी होणार का?

द सीक्रेट मिशन

राधिका कुलकर्णी

किंमत : ₹ २६०/- । (ट.ख. ₹ ५०)



लिखाणासोबत अधूनमधून ह्या कादंबरीवर काम करत होतो. लॉकडाऊन असल्याने कादंबरी कुठे प्रकाशनासाठी पाठवली नाही.

डिसेंबर २०२२ला कादंबरीचे पुन्हा एकदा पुनर्वाचन करून किरकोळ दुरुस्त्या केल्या. जानेवारी २०२३मध्ये महाराष्ट्रातील काही महत्त्वाच्या दोन-चार प्रकाशकांकडे 'जीवदान' कादंबरीची पीडीएफ फाईल ईमेलने पाठवली. (मी नेहमी प्रकाशकांकडे माझी अप्रकाशित पुस्तकाची पीडीएफ फाईल ईमेलने पाठवतो. हार्ड कॉपी पाठवत नाही.)


अजून कोणत्याही प्रकाशकाचे उत्तर आले नव्हते. म्हणून 'जीवदान' कादंबरीची पीडीएफ फाईल नोव्हेंबर २०२३ला ईमेलने राजहंस प्रकाशनाकडे छापण्यासाठी म्हणून सहज विचारार्थ पाठवून दिली. तीनच महिन्यांत अचानक राजहंस प्रकाशनाकडून फोन आला की, 'आपली कादंबरी आम्ही प्रकाशनासाठी स्वीकारली आहे.' साहित्य क्षेत्रातील दर्जेदार आणि प्रतिष्ठित दबदबा असलेल्या 'राजहंस प्रकाशना'कडून माझे अजून एकही पुस्तक प्रकाशित झाले नव्हते. म्हणून साहजिकच खूप आनंद झाला.



***डॉ. सुधीर राजाराम देवरे***
७५८८६१८८५७

## । श्रद्धांजली ।

वास्तुविशारद तसेच निसर्ग व वन्यजीवप्रेमी मराठी लेखक **संजय बापट** यांचे अलीकडेच दु:खद निधन झाले. वास्तुकला, छायाचित्रण, चित्रकला या क्षेत्रांतही त्यांना रुची होती.



'राजहंस प्रकाशन' परिवाराकडून त्यांना आदरांजली.

'नरभक्षकाच्या मागावर' हे त्यांचे केनेथ अँडरसन या निष्णात शिकाऱ्याच्या स्वानुभवावर आधारलेल्या शिकारकथांचे अनुवादित पुस्तक राजहंस प्रकाशनाकडून प्रकाशित झाले आहे.

# फिरुनी नवी जन्मेन मी...

*संगीत हा आयुष्याचा अविभाज्य भाग मानणाऱ्या लेखिका, अभिनेत्री मानसी मागीकर यांच्या या गीत-संगीतविषयक प्रेरक आठवणी आपल्याही मनात रुणझुणत राहतात.*

संगीत हा माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. जन्मापासून माझ्या अवतीभवती संगीतमय वातावरण होतं. माझे आईवडील, बहिणी तसेच आईच्या माहेरी आणि वडिलांकडचेही सगळे लोक संगीतावर विलक्षण प्रेम करतात. माझे आजोबा उत्तम गात असत, काव्य करत असत. माझा मामा उत्कृष्ट तबला वाजवत असे. त्यांनी अनेक मोठ्या कलाकारांना साथसंगत केली होती. नंतर तो तबला शिकवतही असे. तो गाण्याच्या मैफली ऐकण्यासाठी वेड्यासारखा फिरायचा. विशेषत: पंडित भीमसेन जोशींच्या मैफली कितीही अंतर असलं तरी तो पायी जात असे. माझ्या लहानपणी जेव्हा आम्ही सदाशिव पेठेत दोन खोल्यांच्या भाड्याच्या घरात राहत असू, तेव्हा मामा अनेक वेळा आमच्याकडे येऊन माझ्या आईशी लता श्रेष्ठ का आशा श्रेष्ठ असा वाद घालत असे. अगदी अटीतटीने तो लताच्या बाजूला आणि आई आशाच्या. आता विचार केला तर दोघांचंही बरोबरच असायचं. त्यांनाही ते मनात माहीत होतं. खरंतर हा वादच निरर्थक आहे, पण आम्हाला ऐकायला फारच मजा यायची. त्यांच्या वादातून आमच्यावर मात्र गाणं ऐकण्याचे संस्कार होत होते. गाणं नीट ऐकायचं म्हणजे काय, हे कळल्याशिवाय ते म्हणता येतच नाही हे कळत गेलं. माझी मावशीही भजन छान म्हणायची. ती स्वत: पेटी वाजवून म्हणायची. तिने अनेक भक्तिगीतं स्वत: रचून त्यांना चालीही लावल्या. शास्त्रीय संगीतावर आधारित असलेलं मावशीचं मालकंसमधलं 'रामा हे दयाघना' अजूनही कानात घुमतंय. गणपती उत्सवात तर धमाल असायची. तबला-पेटीच्या साथीत धुमधडाक्यात आरती व्हायची.

आम्ही भावंडं जरा मोठे झाल्यावर आईने 'भारत गायन समाजा'त गाणं शिकायला सुरुवात केली. संसारातले सगळे कष्ट उपसत ती विशारद झाली. आता मला कळतंय की ही किती अवघड गोष्ट होती; पण तिने जिद्दीनं, गाण्यावरच्या प्रेमामुळे ते केलं. माझ्या वडिलांनाही गाणं अतिशय आवडायचं. त्यांचा कल नाट्यसंगीताकडे जास्त होता. राम मराठे, छोटा गंधर्व, जयमाला शिलेदार, माणिक वर्मा आणि

बालगंधर्व यांनी गायलेली नाटकातली पदं त्यांना फार आवडायची. विशेषत: देस, तिलककामोद त्यांच्या हृदयाला स्पर्श करत असत. आमच्या शेजारीच राहणारे माझे मोठे काका पेटी छान वाजवत. नंतर माझ्या चुलतभावांनीही थोडीफार ही आवड जोपासली. दुसरे एक काका राम मराठे यांच्या गाण्याचे भक्त होते आणि राम मराठे विरुद्ध छोटा गंधर्व असा वाद रंगायचा. एकदा फार गंमत झाली. तेव्हा 'बॉबी' सिनेमा लागला होता आणि माझ्या काकांनी बहुतेक त्यांच्या मुलामुळे त्यातली गाणी ऐकली. आश्चर्य म्हणजे त्यांना ती आवडली. दुसऱ्या दिवशी आमच्याकडे सांगत आले की, 'बॉबी'तली पदं चांगली आहेत. आम्ही त्यांच्या पदं ह्या शब्दावर इतक्या हसलो! अजूनही आठवलं की फार गंमत वाटते. अशा संगीतप्रेमी कुटुंबात जन्मल्यामुळे, वाढल्यामुळे आपोआपच संगीत आमच्या धमन्यांमधून वाहायला लागलं.

मी सर्वांत पहिलं कुठलं गाणं म्हटलं माहिती आहे...! नीट बोलताही येत नव्हतं आणि गाते काय तर 'अजि मी ब्रह्म पाहिले'. माझी मॉन्टेसरीची शाळा 'भरत नाट्य मंदिरा'तच भरायची. हाही एक भाग्योदय म्हटला पाहिजे. स्टेजला लागूनच एका खोलीत आमचा वर्ग होता. मी गाणी म्हणते, नकला करते हे बाईंना माहीत होतं. मग शाळा सुटायच्या आधी काही वेळ मला स्टेजवर पाठवून कला सादर करण्याची संधी दिली जायची. आम्ही तिघी बहिणी लहानपणी घरी येणाऱ्या पाहुण्यांना रेडिओवर लागणाऱ्या जिंगल्स म्हणून दाखवून त्यांची चांगलीच करावणूक करायचो, पण त्याचबरोबर स्वातंत्र्यवीर सावरकरांचं 'जयोस्तुते' आम्हाला पाठ होतं. तेही आम्ही म्हणून दाखवायचो. आमच्या घराला लागूनच उपाशी विठोबाचं पेशवेकालीन मंदिर होतं. तिथे भजनं व्हायची. आषाढात प्रसिद्ध कीर्तनकारांची सुंदर कीर्तनं व्हायची. नंतर मी 'घर' या विषयावर एकपात्री कार्यक्रम केला, त्यावर कीर्तन ह्या प्रकाराचा प्रभाव आहे. पुढे मी शास्त्रीय संगीत शिकले. गांधर्व महाविद्यालयाच्या काही परीक्षा दिल्या.

मी अकरावीत असताना माझा चुलतभाऊ सुहास तांबे हा एक दिवस, कवी सुधीर मोघे यांना घेऊन आमच्याकडे आला. त्याच्या मनात कवितांचा एक अभिनव कार्यक्रम करण्याची कल्पना होती. पार्श्वसंगीत, थोडंसं नेपथ्य म्हणजे लेव्हल्स वगैरे, थोडी प्रकाशयोजना यांच्या साहाय्याने कविता सादर करायच्या. काही कविता नुसत्या म्हणायच्या होत्या, तर काही गायच्या होत्या. सुधीरजींनी जेव्हा मला काहीतरी म्हणून दाखवायला सांगितलं. तेव्हा मी वसंत बापट यांची 'भव्य हिमालय तुमचा आमुचा...' ही कविता अगदी शाळेत शिकवल्याप्रमाणे ठासून म्हणून दाखवली आणि त्यांनी चक्क माझी निवड केली. मग आमची तालीम सुरू झाली. ती फार वेगळी होती. सुधीरजींनी कधीच मला ही कविता अशी म्हण, ही ओळ दोनदा म्हण किंवा आवाजाचा चढ - उतार असा कर; असं काहीच सांगितलं नाही. तर


त्यांनी त्यांच्याजवळ असलेला कविता - गाणी यांचा खजिनाच माझ्यापुढे मुक्त केला. त्यांचंही पहिलं प्रेम गाण्यावरच होतं आणि हातात पेटी आली की त्याला कसलंच भान उरत नसे. मग १९५० ते १९६०च्या दशकातली चित्रपटांच्या सुवर्णकाळातली असंख्य गाणी ते तन्मय होऊन गात असत. लता मंगेशकर, आशा भोसले, महंमद रफी, तलत मेहमूद, मुकेश, हेमंतकुमार अशा थोर कलाकारांनी गायलेली आणि मला तोवर माहीत नसलेली खूप गाणी ऐकायला मिळाली. ती ऐकता ऐकता माझ्या मनावर लाख मोलाचे संस्कार होत होते. त्यामुळे त्या वेळच्या माझ्या वयाला, खरं म्हणजे न पेलवणाऱ्या कविता मी चांगल्या प्रकारे सादर करू शकले. ही शिदोरी मला आयुष्यभर पुरेल इतकी होती.

मी काही संगीतनाटकांमध्ये कामं केली. त्याची सुरुवात शाळेत असतानाच झाली होती. त्या वेळी दुर्लक्षित झालेल्या संगीत रंगभूमीला पुनरुज्जीवन देण्याचं काम शिलेदार कुटुंबीय करत होते. कीर्तीताई, लताताई या आई-वडिलांच्या मार्गदर्शनात तयार होत होत्या. माझ्या एका काकांमुळे आमची त्यांच्याशी ओळख झाली होती. कीर्तीताई शारदेचं काम करत असे. तेव्हा तिच्या मैत्रिणीची कामं मी आणि माझी धाकटी बहीण करत असू. तेव्हा जयमालाबाईंनी आमच्याकडून एक गमतीशीर गाणं बसवून घेतलं होतं. नंतर जेव्हा मी शारदेचं काम केलं, तेव्हा साक्षात जयराम शिलेदारांनी माझं कौतुक केलं. जयमालाबाईंकडे मी काही काळ नाट्यसंगीत शिकले होते. भारत गायन समाजात वैद्यसर, नंतर शैलाताई दातार, शशिताई शिरगोपीकर यांच्याकडे गाणं शिकण्याचा प्रयत्न केला; पण काय झालं की गाणं हे रियाजाशिवाय, चिकाटीशिवाय येत नाही. दुर्दैवाने माझ्याजवळ अशी जिद्द नव्हती.

आईवडील नेहमी म्हणत की, अभिनय काही काळच तुम्ही करू शकता; तसेच तो दुसऱ्याने संधी देण्यावरही अवलंबून असतो. पण गाणं शेवटपर्यंत तुमची साथ सोडत नाही. गाण्यात एक अवर्णनीय आनंद मिळतो. आत्मिक समाधान मिळतं. तेव्हा मी गाण्याची साधना करावी अशी त्यांची अपेक्षा होती. माझ्या वडिलांना एकदा तर मला 'स्वयंवर'मधल्या रुक्मिणीच्या भूमिकेत बघायचं होतं; पण त्यांची ही इच्छा मी पूर्ण करू शकले नाही. याची मला आजही मनस्वी खंत वाटते. एक कारण असंही होतं की, अभिनय मला सहज जमत केला. आता जशी आयुष्याबद्दलची समज प्रगल्भ होत गेली, तशी मला गाण्यातून मिळणाऱ्या शाश्वत आनंदाची, निखळ समाधानाची, अंतर्मनाच्या शांतीची महती कळते आहे. माझा पुनर्जन्मावर विश्वास नसला तरी केवळ गाण्यासाठी 'फिरुनी नवी जन्मेन मी' असं कळकळीनं म्हणावंसं वाटतं.

***डॉ. मानसी मागीकर***
९८८११२२५८८

## ‘राजहंसी’ विविधा




मृत्यू समीप असतानाही जगावेगळा विचार करणाऱ्या व्यक्तींच्या या आहेत असामान्य जीवनस्पर्शी आणि वास्तवदर्शी कथा... यांतील प्रसंग, गूढता, ताणतणाव आणि दिलासा देणारा हळुवार स्पर्श वाचकांना मनभावन होईल.

### सोबत सांजवेळची

डॉ. प्रियदर्शिनी कुलकर्णी । अनु. : पद्मजा मेहेंदळे

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)


गेल्या अर्धशतकातील वेगाने बदलत्या जीवनाच्या साऱ्याच पातळ्या, आयाम, बाजू, संबंध, गुंतागुंत समग्रपणे कवेत घेणाऱ्या, ‘मोठ्या समाजमनाचे प्रतिबिंब’ अन् ‘मोठ्या कालखंडाचा कॅनव्हास’ घेऊन काव्यकृती साकारणाऱ्या एका कवीचा काव्यप्रवास... वेगळी शैली, वेगळा आशय यांनी नजरेत भरणारा...

### त्यानंतर...

श्रीपाद भालचंद्र जोशी

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)




सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या पृथ्वीचे अंतरंग, तिचे आजतागायत सुरू असलेले बदल आणि त्याला कारणीभूत घटक यांची रंजक आणि सुबोध शास्त्रीय मांडणी...!

### शोध बदलत्या पृथ्वीचा

सतत बदलत्या भूगर्भीय घडामोडींचा वेध

सुनीत पोतनीस

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

# क... कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## प्रीत

अद्‌भुत अस्फुट कोमल हळवी
ओढ अनामिक तगमग वेडी
कधी उमलली अस्फुट फुलली
आधी अधुरी तशीच सुकली ॥१॥

शब्द अडले कटाक्ष नुसते
हो का नाही झोप उडते
अबोध असीम आकर्षण ते
स्वप्नच सारे खरे भासते ॥२॥

शाळा सुटली, वाटा फुटल्या
नव्या प्रेरणा, सुसाट सुटल्या
लाटांवरती चढलो, बुडलो
रेशीमकोशी घट्ट गुंतलो ॥३॥

या सांज-समयी कातरवेळी
हात हांती अलगद धरुनी
नजर गुंतता हळुच बोलली
प्रीत आपुली रुजली, फुलली ॥४॥

देत दुजोरा किंचित हसुनी
हो म्हणे मी हलके चुंबुनी
परि
खोल अंतरी कोपऱ्यात ती
मंद तेवते नवथर प्रीती ॥५॥

न कळे हिजला तर ही कसली
मिस्किल पृच्छा, ती आठवली
गाभूळल्याविण फळ कधी ते
रस पाझरते, नवबीज निर्मिते
अरे,
इथेही अपुले एकच दिसते ॥६॥

***डॉ. प्रसन्न दाभोलकर***

## ‘राजहंसी’ विविधा



व्यक्तिस्वातंत्र्याच्या कडेलोटावर उभे असणाऱ्या भारतीय समाजाला लोकशाही संस्कृतीची आणि धर्मनिरपेक्षतेची अपरिहार्यता, हुकुमशाहीतील धोके सांगणारे, सशक्त लोकशाहीसाठीचे साक्षेपी चिंतन म्हणजे हे पुस्तक -

### लोकशाही आणि हुकुमशाही

नरेन्द्र चपळगावकर

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)


बुद्धिबळाच्या विविध वैशिष्ट्यांचा...
या खेळाच्या इतिहासातील अज्ञात वळणांचा...
खेळाडूंच्या कर्तृत्वाचा... आणि चित्रपटातून
दिसलेल्या बुद्धिबळ क्षेत्राचा मागोवा घेत
बुद्धिबळ जगताची रोचक सफर घडवणारे पुस्तक.

### ६४ घरांच्या गोष्टी

रघुनंदन गोखले

किंमत : ₹ ४७५/- । (ट.ख. ₹ ५०)





मिस्कील आणि मनस्वी. प्रेमळ आणि फटकळ.
नर्मविनोदी आणि स्पष्टवक्ती. आग्रही आणि पारदर्शी.
सईंच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू
उलगडणारे आत्मकथन!

### सय माझा कलाप्रवास

सई परांजपे

आवृत्ती सातवी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# सय

*सई परांजपे यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, कलाजीवनातील त्यांच्या प्रेरणा, परदेशप्रवास, तेथील सांस्कृतिक जीवनाचा त्यांच्यावरील प्रभाव, बहुसांस्कृतिकतावाद अशा विविध अंगांनी उलगडत जाणारा हा कलाप्रवास...*

प्रतिभासंपन्न कलावंत आपल्या आयुष्यातील कलाप्रवासाचा वेध केव्हा घेतो? जेव्हा त्याच्याकडे सांगण्यासारखं खूप काही असतं.. विख्यात सिने-नाट्य दिग्दर्शिका, लेखिका, पद्मभूषण सई परांजपे यांच्या 'सय-माझा कलाप्रवास' या पुस्तकाची सातवी आवृत्ती प्रकाशित झाली. निमित्त होतं सई परांजपे यांच्या 'दरवळ' या कार्यक्रमाचं. पुण्यातील ज्योत्स्ना भोळे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात आपला एकूण कलाप्रवास व लेखनाविषयी सांगताना लेखिका आपलं दिलखुलास मनोगत सांगत होत्या. 'सय' नक्की काय आहे? त्याची निर्मिती कशी व कुठे झाली? हा सगळा रोचक प्रवास वाचण्यासारखा आहे. कलाविश्वातले असंख्य तारे अनुभवलेल्या सईताईंनी 'सय'च्या निमित्तानं त्यातील निवडक अनुभव वाचकांसाठी खुला केला आणि इतके दिवस नाटक, सिनेमा, दूरदर्शन अशी बहुआयामी कारकिर्द गाजवलेल्या मनस्विनीला तिच्या हक्काचा वाचकवर्ग राजहंस प्रकाशनानं मिळवून दिला. प्रतिष्ठित घराण्याकडे समाजाचं लक्ष असतं. त्यातील पुढच्या पिढ्या किंवा एखादं व्यक्तिमत्त्वं कसं आकार घेतं यावर त्या कुटुंबाचा लौकिक असतो. 'देणं समाजाचं समाजासाठी' हे ब्रीद परांजपे कुटुंबातील प्रत्येकानं आयुष्यभर जोपासलं. त्या देण्यात कसलाही अभिनिवेश नव्हता तर खोल मनाच्या तळाशी एक संवेदनशील देशप्रेमाची, सामाजिक - शैक्षणिक जाणीव होती.

प्रस्तुत पुस्तकात शिरल्यावर एकेक पात्र - प्रसंग - काळ व दृश्यात्मक जाणीव मनाला स्पर्श करते. लेखिकेला जे सांगायचं आहे ते आणि तिचा मूळ स्वभाव या दोन्ही बाबी एकरूप आहेत. त्यामुळे त्या आपल्या लिखाणात वास्तवदर्शी चित्रण मांडू शकल्या. थोर गणिती प्रा. र. पु. परांजपे हे सई परांजपे यांचे आजोबा, तर संततिनियमनाचं पायाभूत कार्य करणाऱ्या थोर समाजसेविका शकुंतलाबाई परांजपे या लेखिकेच्या आई होत.

परांजपे मंडळी ही सगळीच ज्ञानाची उपासना करणारी आहेत. आणि तोच संस्कार सई परांजपे यांच्यावर झाला आहे. ही सगळी माणसं विद्यावंत, कलावंत आणि प्रतिभावंत आहेत. सई परांजपे यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वावर त्यांचे आजोबा व आई यांचं काय योगदान राहिलं आहे? त्यांच्या कलाजीवनात प्रेरणा काय होत्या? असंख्य परदेशप्रवास, तेथील सांस्कृतिक जीवनाचा त्यांच्यावर कोणता प्रभाव पडला? बहुसांस्कृतिकतावाद, भाषिक देवाण-घेवाण अशा सर्व अंगांनी लेखिकेचा कलाप्रवास उलगडत जातो.

वयाच्या आठव्या वर्षी सई परांजपे यांचं 'मुलांचा मेवा' पुस्तक प्रसिद्ध झालं! हे त्यांचं पहिलं पुस्तक. त्यानंतर त्यांनी बालनाटिका, नाटकं, एकांकिका, पटकथा, अनुवाद, कविता अशा अनेक प्रकारांमध्ये लेखन केलं आहे. केवळ लेखनच नाही, तर दिग्दर्शन आणि काही नाटकांची निर्मितीही केली. NSDमध्ये असतानाही त्यांचं लक्ष अभिनयापेक्षाही लेखनातील बारकाव्यांकडे असे. त्या म्हणतात की, आधी मी लेखिका आहे. त्यांचं अनेक भाषांवर प्रभुत्व असल्यामुळे त्या भाषांमधून लेखन आणि अनुवाद केले आहेत. त्यांचं वाचनही अफाट आहे. आपल्या लेखनाविषयी त्या म्हणतात की, 'मी कधीच ठरवून विषय शोधत गेले नाही. विषयच माझा मागोवा घेत आले.' काही विषय समाजातील घटना पाहून सुचतात, तर काहींचे बीजारोपण नकळत होऊन अचानक केव्हातरी लिखाणाचा अंकुर फुटतो. 'सय'मध्ये पृष्ठ ९४वर त्यांनी स्वत:च्या लेखनाविषयी सांगितलं आहे. पॅरिसमध्ये असताना त्यांनी बरेच लिखाण केलं. त्यातील 'रोमचा विमानतळ' हा लेख 'सत्यकथा'मध्ये छापून आला. बराच गाजला.


या लेखामुळे श्री. पु. भागवतांसारखे रसिक, विद्वान आणि दर्दी साहित्यपंडित त्यांना ज्येष्ठ स्नेही म्हणून लाभले. त्यांनी सई परांजपे यांना लिहायला सतत उद्युक्त केलं. सिनेमाकडे वळल्यावर त्यांचं इतर लिखाण थांबलं. तेव्हा श्री. पु. भागवत त्यांना म्हणत, 'सिनेसृष्टीत गेल्यापासून तुम्ही निरक्षर झाला आहात!' खरं तर सई परांजपेंनी जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत मनसोक्त संचार केला. साहित्य, नाटक, सिनेमा, दूरदर्शन, नभोवाणी अशा वेगवेगळ्या माध्यमांसाठी त्या लेखन करत राहिल्या. स्वत:च्या लिखाणाविषयी त्या सांगतात की, 'माझ्या प्रत्येक लिखाणात मी माणूस महत्त्वाचा मानला आहे, माणसांत दडलेल्या याच माणूसपणाचा शोध घेण्याचा मी माझ्या कलाकृतीतून सातत्याने प्रयत्न करते.' यावरून त्यांच्यातील संवेदनशील व तेवढ्याच तरल मनोभूमिकेचा अंदाज बांधता येतो. 'एक प्रतिभावंत मनस्विनी' अशी बिरुदावली त्यांना समीक्षकांनी बहाल केलेली आपल्याला दिसते. त्यामुळेच 'सय'चे सर्व क्षेत्रांतील संवेदनशील वाचकप्रेमी पुन्हा एकदा या कलाकृतीचं मनापासून स्वागत करतील याची खात्री आहेच.

***स्वप्निल जोशी***

(दैनिक दिव्य मराठी, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ मधून साभार)

# राजहंसी पार

## काय घडलं ‘राजहंसी’ नगरीत?



### नाट्यभारती : प्रकाशन सोहळा



डावीकडून : वासुदेव हातवळणे, अरुण डिके, पद्मभूषण डॉ. नंदू लाड,
सुनीता लोहोकरे, आरती घारे, नीरजा खेर आपटे

‘नाट्यभारती - बाबा डिके ते श्रीराम जोग सत्तर वर्षांचा अनोखा प्रवास’ या पुस्तकाचे प्रकाशन पद्मभूषण डॉ. नंदू लाड यांच्या हस्ते २९ नोव्हेंबर २०२५ रोजी पुण्यातील गांधीभवन येथे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी नाट्यभारती, इंदौरचे प्रमुख आधारस्तंभ, शेतीतज्ज्ञ व लेखक अरुण डिके, पूर्वाश्रमीचे अभिनेते- मालाड साईबाबा आश्रमाचे वासुदेव हातवळणे यांच्यासह राजहंसच्या संपादिका आरती घारे आणि पुस्तकाच्या लेखिका सुनीता लोहोकरे व्यासपीठावर उपस्थित होत्या.

‘नाट्यभारती’च्या परंपरेनुसार नीरजा खेर आपटे व अरुण डिके यांनी गायलेल्या ‘सिद्ध भजो’ या निर्गुणी भजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर रंगकर्मी श्रीराम जोग यांनी सादर केलेली ‘एक गूंगे की आत्मकथा’ ही २५ मिनिटांची एक चित्रफीत दाखवण्यात आली. मुख्य कार्यक्रमाच्या प्रारंभी अरुण डिके यांनी नाट्यभारतीच्या कार्याची थोडक्यात ओळख करून देऊन पुस्तकाचा परिचय करून दिला. ‘बाबा डिके यांनी स्थापन केलेल्या या संस्थेने गेली सत्तर वर्षे कमीतकमी साधनांच्या साह्याने नाटके सादर करून नाट्यकर्म हे सेवाकार्य असल्याचे दाखवून दिले.’ असे ते म्हणाले. वासुदेव

हातवळणे यांनी इंदौरमधील आपल्या बालपणीच्या आठवणी सांगितल्या. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जगताना रंगकर्मी बाबा डिके यांनी आपल्यापुढे मदतीचा हात केला आणि अभिनयाचेही धडे दिले. या शिक्षणामुळेच 'सुहागरात'सारख्या हिंदी चित्रपटात आपण महत्त्वाची भूमिका साकारू शकलो, अशी कृतज्ञता व्यक्त केली.

राजहंसच्या संपादिका आरती घारे यांनी प्रकाशनाकडून हे पुस्तक स्वीकारण्यामागची भूमिका विशद केली. राजहंसकडून आजवर नाटकासंबंधीची अनेक पुस्तके प्रकाशित करण्यात आली असून हे पुस्तकही राजहंसी लेखकांचेच पुस्तक असल्याची आठवण त्यांनी करून दिली. या पुस्तकासाठी प्रकाशनगृहातील साह्य लाभलेल्या अन्य सहकाऱ्यांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. लेखिका सुनीता लोहोकरे यांनी पुस्तकाची प्रक्रिया उलगडली. जुन्या काळातील ज्येष्ठ अभिनेत्री व नाट्यभारतीच्या जडणघडणीतील प्रमुख सुमन धर्माधिकारी यांनी आपल्या खणखणीत आवाजात पूर्वीचा काळ आपल्यासमोर उभा केला, असे त्या म्हणाल्या. इंदौरमध्ये जाऊन नव्या-जुन्या कालाकारांशी साधलेला संवाद पुस्तकासाठी उपयुक्त ठरला, असे सांगून इंदौरमधील वास्तव्यात डिके कुटुंबाने दिलेले प्रेम आणि आदरातिथ्याने आपण भारावून गेलो, असे त्या म्हणाल्या. त्याचप्रमाणे पुणेकरांनी इंदौरकरांकडून स्वच्छतेचे धडे जसे गिरवायला हवेत; तसेच आपले संस्कारही पुन्हा शिकून घ्यायला हवेत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

पद्मभूषण डॉ. लाड यांनी इंदौरमधील आपल्या आठवणी सांगून होळकर शासनकर्त्यांनी इंदौरमध्ये नाटकाची आवड कशी रुजवली, याची माहिती उपस्थितांना दिली. येणाऱ्या पिढ्यांसाठी हे पुस्तक महत्त्वपूर्ण ठरेल, असे सांगून पुस्तकाच्या मुखपृष्ठाचा व मलपृष्ठाचा उल्लेख करून मलपृष्ठावरील नऊ ओळींत सर्व सार आले असल्याची प्रशंसा त्यांनी केली. नव्या पिढीने मोबाइल फोनचा वापर कमी करून आपल्या कुटुंबासाठी, समाजासाठी अधिक वेळ द्यावा, असे ते म्हणाले. सोशल मीडियावर वेळ खर्च करण्याऐवजी नाटक पाहा, लोकांमध्ये मिसळा, कार्यमग्न राहा आणि पुस्तकवाचन करा, असा सल्ला त्यांनी दिला.

या कार्यक्रमासाठी 'आनंदवन'चे संचालक विकास आमटे यांनी पाठवलेला विशेष संदेश वाचून दाखवण्यात आला. या संदेशात त्यांनी आनंदवन व नाट्यभारती यांच्यातील नातेसंबंधाला उजाळा दिला आणि नाट्यभारतीच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीरजा खेर आपटे यांनी केले. त्यांनी गायलेल्या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

❖

# वाचकांच्या मनातलं

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## घुमक्कडी

कविता महाजनांचे 'घुमक्कडी' अगदी योग्य वेळी हातात पडलं.

'श्रावणात आपण एखादे पुस्तक वाचू या' असं सुखदानं सुचवलं. तिची ही कल्पना खूप आवडली आणि कुठलं पुस्तक वाचायचं याबाबत नावं सुचवासुचवी सुरू झाली. नेमकं त्याच दिवशी राजहंसचं पार्सल आलं. उघडून पाहिलं त्यात 'घुमक्कडी' नजरेस पडलं.

खरं म्हणजे कविता महाजनांचं असं एखादं नवीन पुस्तक येईल हे कल्पनेच्या पलीकडचं होतं. त्यामुळे अधीरतेनं हातात घेतलं आणि वाचायला सुरुवात केली. पंकज भोसले यांच्या मनोगतातूनच पुस्तकाची कल्पना आली. कविता महाजनांनी प्रचंड प्रवास केला. निकोबारपासून सिक्कीम, मेघालय, राजस्थान असा अनवट भारत पालथा घातला. त्या त्या प्रदेशातील आदिवासी महिलांशी गप्पा मारल्या आणि असंख्य लोककथा, दंतकथा, कल्पक कथांचा संग्रह केला. ब्लॉगसाठी लिहिताना या सर्वांच्या जोडीला या कथांशी साम्य असणाऱ्या जर्मनी, डेन्मार्क, फिलिपाईन्स, चीन, नॉर्वे इत्यादी देशांतील लोककथांचाही समावेश केला. हे लेखनच पुस्तकस्वरूपात प्रसिद्ध झाले.

एकूण श्रावण महिन्यातील वाचनासाठी अगदी योग्य असं पुस्तक हातात पडलं. लहानपणी श्रावणात सोमवारची कहाणी, शुक्रवारची कहाणी, आदित्य राणूबाईची कहाणी अशा कहाण्यांचं पुस्तक आवडीनं वाचलं होतच. त्याची आठवण झाली आणि 'घुमक्कडी' वाचायचं ठरवलं .

वाचायला सुरुवात केली आणि दोघं वाचनात गुंगून गेलो. शक्यतो रोज दोन कथा वाचायच्या हा नियम आखून घेतला. एवढ्याशा कथा पण त्यातून विविध प्रांतांतील, देशांतील रूढी, परंपरा, मिथक यांची आगळीवेगळी माहिती मिळाली. 'तुमच्या हातात

एक फूल दिलं तर’ हा लेख वाचला आणि त्यांच्याबरोबर केलेली कास पठाराची सहल आणि त्या निमित्तानं घडलेला त्यांचा सहवास आणि विविध विषयांवरील गप्पा आठवल्या.

पुस्तकाचा वाटमोड अर्थात डेड एंड आलाय. तिथे त्यांनी म्हटलंय, ‘डेड एंडपेक्षा वाटमोड हा शब्द मला अधिक आवडतो. त्यात संपणं वा शेवटही सूचित केलेला नाही आणि मृत्यू तर नाहीच नाही. वाट फक्त मोडली आहे, त्यामुळे इथून वळा, मागे फिरा वा डावी-उजवीकडे जा आणि दुसऱ्या वाटेने मंझील गाठा. मुक्कामी पोहोचा.’

त्याप्रमाणे त्यांनी वेगळी वाट धरली आणि त्यांचा अनंताचा प्रवास सुरू झाला. या प्रदेशातील कथा आपल्याला कधीच वाचायला मिळणार नाहीत. त्यांच्या लेखनाचा तो डेड एंड ठरला. ही खंतच आता मन व्याकूळ करते.

***डॉ. उमेश करंबेळकर***

## संघातील मानवी व्यवस्थापन...

‘संघातील मानवी व्यवस्थापन... एका स्वयंसेवकाच्या नजरेतून...’ हे एक अप्रतिम पुस्तक आहे. श्री. नितीन गडकरींचे संघाबद्दलचे विचार अगदी जसे आहेत तसेच कारण मीही एक संघाचा स्वयंसेवकच आहे.

विवेक घळसासी यांचे प्रास्ताविक तर अप्रतिमच... हत्ती आणि पाच आंधळे या




प्रवासपर लेखनकुळाशी जवळचं नातं सांगणाऱ्या या प्रवासाच्या गोष्टी आणि गोष्टींचा प्रवास. पृथ्वी, सूर्य, अग्नी, पाऊस आदींच्या उत्पत्तीबद्दलच्या लोककथांचा प्रवास येथे लेखिकेच्या प्रवासाशी एकरूप झालाय. ब्लॉगसाठी लिहिलेल्या या प्रवासनोंदी, पण अत्यंत गंभीर आणि अनेक तपशिलांना कवेत घेणाऱ्या...

घुमक्कडी

कविता महाजन

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

अमर कथेप्रमाणे काहींची संघाबद्दलची धारणा चुकीची आहे. संघ समजण्यासाठी संघ शाखेवर जाऊन अनुभव घेणेच महत्त्वाचे होय. संघातील मानवी व्यवस्थापन.. एका स्वयंसेवकाच्या नजरेतून म्हणूनच जरूर वाचनीय. राजहंसचे अभिनंदन.


***किशोर काकडे***
बेळगाव

---

## पाकिस्तान का मतलब क्या?

राजहंस प्रकाशनाने नुकतेच प्रसिद्ध केलेले श्रीधर लोणी यांचे 'पाकिस्तान का मतलब क्या?' हे पुस्तक वाचनात आले. पुस्तकाच्या संदर्भ सूचीमध्ये ३१ इंग्रजी पुस्तके आणि ८ मराठी पुस्तके आहेत. यांमध्ये काही ख्यातनाम लेखकांचा समावेश आहे. सुमारे सव्वातीनशे पानांच्या पुस्तकामध्ये १५ विषयांच्या मांडणीसाठी स्वतंत्र भाग केले आहेत. यामुळे लष्कर, जिहाद, तालिबान, प्रांतिक अस्मिता, अधोगतीची कारणे, दहशतवाद, चिनी मैत्री, अमेरिकेशी विविध कारणांसाठी झालेली जवळीक अशा विषयांचे आकलन वाचकाला सहजपणे होते. पाकिस्तानची अर्थव्यवस्था, आजवरचे लष्करप्रमुख, आजवरचे पंतप्रधान, पाकिस्तानमधील मुख्य राजकीय घराणी, त्यांच्या कुरघोड्या या विषयांवर पुस्तकामध्ये विस्तृत मांडणी आहे. तसेच पाकिस्तानमधील बिकट अर्थव्यवस्था, पाणीटंचाई, शिक्षणपद्धती, दारिद्र्य यांवर अभ्यासपूर्ण बारकाव्यानिशी ऊहापोह केला आहे. या पार्श्वभूमीवर 'गवत खाऊ, परंतु अणुबॉम्ब


रा. स्व. संघातून तयार झालेल्या स्वयंसेवकांनी संघाच्या संस्कारबळावर विविध संघटनात्मक कार्ये उभी केली. विविध सेवाकार्यांत त्यांनी कार्य केले. हाच शक्तिसाठा म्हणजे 'संघपरिवार'. 'सामान्यांतल्या असामान्य क्षमता फुलवून मोठी कामे करणारी संघटना म्हणजे रा. स्व. संघ'



संघातील मानवी व्यवस्थापन
एका स्वयंसेवकाच्या नजरेतून
नितीन गडकरी
आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)


बनवू' हे भुट्टो यांचे १९७२मधील विधान, किंवा १९७४मध्ये (१९७६ हवे) अयुब खान यांच्या राजवटीत तरबेला नावाचे बांधलेले धरण हे शेवटचे धरण ठरले. वाढत्या विरोधामुळे 'कालाबाग धरण प्रकल्प' मुशर्रफ यांनासुद्धा बासनात गुंडाळून ठेवावा लागला. पुढे २०१९मध्ये इम्रान खान यांनासुद्धा हा प्रकल्प पुढे नेणे शक्य झाले नाही. पाकिस्तानमधील राजकीय आणि सामाजिक अस्थिरता पुस्तकामध्ये प्रभावीपणे मांडली आहे. पुस्तकातील या गोष्टी वाचकांचे लक्ष वेधतात. आंतरराष्ट्रीय घडामोडीचे अभ्यासक श्रीकांत परांजपे यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, हे पुस्तक पाकिस्तानचा इतिहास, संस्कृती, राज्यव्यवस्था, राजकारण, अर्थव्यवस्था, सामाजिक बांधणी या सर्व बाबी समजण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. यांतील फक्त संस्कृती हा शब्द खटकतो. कारण फाळणीनंतर आजवर पाकिस्तानमधील सांस्कृतिक जीवन नेमके कसे आहे, याची उत्कंठा हे पुस्तक वाचताना वाचकाच्या मनात नक्की वाढत जाते. यावर पुसटसा उल्लेख असला तरी, एक स्वतंत्र प्रकरण हवे होते असे वाटले.

विशेषत: दैनंदिन जीवन आणि सण-उत्सवांवर इस्लामचा प्रभाव पाकिस्तानी संस्कृतीवर खूप मोठा आहे. तसेच भाषा आणि साहित्य. पाकिस्तानमध्ये अनेक भाषा बोलल्या जातात; ज्यांत उर्दू, पंजाबी, सिंधी, पश्तो आणि बलोची प्रमुख आहेत.

कला आणि संगीत : पाकिस्तानी कला आणि संगीत विविध प्रादेशिक शैलींचे मिश्रण आहे, ज्यांत लोककला, चित्रकला आणि संगीत यांचा समावेश आहे.

पारंपरिक कपडे आणि आहार : पाकिस्तानी खाद्यपदार्थ, तेथील प्रादेशिक चव आणि पाककृती.

सामाजिक जीवन : जिथे पारंपरिक मूल्ये आणि संबंध जपले जातात.




पाकिस्तानचा इतिहास, संस्कृती, राज्यव्यवस्था, राजकारण, अर्थव्यवस्था, सामाजिक बांधणी आदींचा वेध; तसंच स्वतंत्र, सार्वभौम आणि एकसंघ राष्ट्र म्हणून पाकिस्तानचं भवितव्य काय असेल याविषयीचं साक्षेपी विवेचन.

## पाकिस्तान का मतलब क्या?

श्रीधर लोणी

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

विविधता : पाकिस्तानमध्ये अनेक वांशिक-धार्मिक गट आहेत, ज्यामुळे संस्कृतीत विविधता.

ट्रक आर्ट : हे पाकिस्तानी संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे, जिथे लोक विविध चित्रांनी ट्रकला सजवतात.

कला आणि साहित्यातील बदललेले प्रवाहदेखील वाचकाला जाणून घ्यावे असे वाटतात. थोडक्यात पाकिस्तानमधील नागरिकांचे जीवनमान समजण्याच्या दृष्टीने संस्कृती, कला, साहित्य यांवर एक स्वतंत्र प्रकरण हवे होते इतकेच. लष्करी अधिकारी वैयक्तिक लाभासाठी संरक्षणासाठीच्या तरतुदींचा वापर करतात. याला मिलीबस म्हणतात. ही मिलीबस संकल्पना सुन्न करते. अनेक उद्योग निवृत्त लष्करी अधिकारी वा लष्कर चालवतात. अशा नवनवीन संकल्पना पाकिस्तानमध्ये उदयास आलेल्या आहेत. हे या पुस्तकामध्ये विस्ताराने समजते.

मुखपृष्ठ, मांडणी, फॉन्ट साईझ या दृष्टींनी पुस्तक खूप सरस आहे. एकंदरीत या पुस्तकाने मी खूप प्रभावित झालो. पूर्ण पुस्तक वाचून झाल्यावर मनात एक प्रश्न उपस्थित झाला. या मराठी भाषेतील पुस्तकाला हिंदी भाषेतून शीर्षक देण्याची गरज का पडली? 'पाकिस्तानची गाथा' असे शीर्षकसुद्धा साजेसे झाले असते.

***रवींद्र मिराशी***


**मुखपृष्ठ, मुखपृष्ठाच्या व मलपृष्ठाच्या आतील पानांवरील व मलपृष्ठावरील पुस्तकांविषयी...**

- साहेबाच्या देशात — किंमत : ₹ ३७०/-
  गिरीश कुबेर
- नाट्यभारती — किंमत : ₹ ६००/-
  सुनीता लोहोकरे
- सहकार 'स्वरूपा' — किंमत : ₹ ३००/-
  सुमेध वडावाला (रिसबूड)
- आर. डी. बर्मन — किंमत : ₹ २००/-
  सुहास किर्लोस्कर

कधी न गळणारा

## 'राजहंसी' मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**'राजहंस ॲप'**

App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play
अँड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी

तुम्ही 'राजहंस'ला असेही भेटू शकता


Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अनुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्य अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

विश्वासार्हता, कल्पकता आणि चोख आर्थिक शिस्तीच्या बळावर
'स्वरूपानंद पतसंस्थे'ची भक्कम पायाभरणी करणारे तसेच
राजकारण आणि वाचक चळवळ यांतही
यशस्वी मुशाफिरी करणारे दीपक पटवर्धन!

सार्वजनिक जीवनातील त्यांच्या या यशस्वी प्रयत्नांचे हे प्रांजळ आत्मकथन...



Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)
Periodical post

आर. डी. बर्मन यांच्या समृद्ध संगीताची वैशिष्ट्यं आणि त्यांच्या निवडक २५ चित्रपट-गीतांचं रसग्रहण यातून चित्रपट व संगीत अभ्यासक सुहास किर्लोस्कर यांनी घेतलेला आर. डी. यांच्या संगीताचा हा रसिक शोध....




**आर. डी. बर्मन**

सिनेसंगीतातील
जीनियस पंचम

सुहास किर्लोस्कर

प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन,** १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन - २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**